दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -७० | शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-70 | Saturday, Dt.15 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## पार्वतीबाई महादेव पडोळे यांचे दुःखद निधन

धर्माबाद प्रतिनिधी

धर्माबाद तालुक्यातील बन्नाळी येथील रहिवाशी पार्वतीबाई महादेव पडोळे यांचे आज पहाटे दुःखद निधन झाले.मृत्यू समयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. धर्माबाद शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूलचे सहशिक्षक व पत्रकार अशोक पडोळे यांच्या त्या आई होत्या. आज सायंकाळी बन्नाळी येथे चार वाजता त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुलं, सुना नातू, नातवंड असा त्यांचा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त तथा स्वर्गवासी मुख्याध्यापक महादेव पडोळे यांच्या त्या धर्मपत्नी होत्या. अंत्यसंस्कारास बनाळी येथील ग्रामस्थ आणि नातेवाईक आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राज्यात तबब्ल ८ पक्षांची व्यापक महाआघाडी

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक बदलापूर पॅटर्न ऐतिहासिक ठरणार

मुंबई : राज्य निवडणूक आयोगाकडून नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होताच संपूर्ण महाराष्ट्रात राजकीय हालचाली वेगवान झाल्या आहेत. २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी असल्याने सर्व पक्षांनी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

बदलापुरातील या ऐतिहासिक युतीची औपचारिक घोषणा महाविकास आघाडीकडून झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली. शिवसेना (ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी(शरद पवार), मनसे, वंचित बहुजन आघाडी, बहुजन मुक्ती पार्टी, आम आदमी पार्टी आणि आरपीआय (आर. के. गट) असे आठ पक्ष एकत्र येत २४ पैकी २२ प्रभागांमध्ये जागावाटप निश्चित करण्यात आले आहे. स्थानिक नेतृत्वाने दिलेल्या माहितीनुसार, नगराध्यक्षपदासाठी शिवसेना ठाकरे गटाची प्रिया गवळी आणि मनसेची संगीता चेंदवणकर अशी दोन नावे वरिष्ठांकडे पाठवण्यात आली असून अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. या घोषणेनंतर बदलापुरातील निवडणूक अधिकच चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर असल्याने सर्व पक्षांचा वेग वाढला आहे. शिवसेना-भाजपच्या महायुतीने अद्याप आपल्या उमेदवारांची घोषणा केलेली नसली तरी



महाविकास आघाडीकडून आठ पक्षांमध्ये ४५ जागांचे वाटप करून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. या वाटपात शिवसेना ठाकरे गट आणि बहुजन मुक्ती पक्षाला प्रत्येकी ११ जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला ६, काँग्रेसला ५, मनसेला ३ तर वंचित बहुजन आघाडीला ५ जागा देण्यात आल्या आहेत. आम आदमी पार्टीला २ आणि आरपीआय आर. के. गटाला १ जागा मिळाली आहे. बहुजन मुक्ती पक्षाला स्वत:चे चिन्ह नसतानाही ११ जागा मिळाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

### मतदारांच्या एकत्रीकरणाचा फायदा

या जागावाटपावर स्थानिक राजकारणात मिश्र प्रतिक्रिया दिसत आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादीपेक्षाही दुप्पट जागा बहुजन मुक्ती पक्षाला देण्यात आल्याने ही युती बदलापुरातील दलित आणि बहुजन मते एकत्र आणण्याचा प्रयत्न असल्याचे काही राजकीय निरीक्षक म्हणतात. तर काहीजणांच्या मते या जागावाटपामुळे महायुत्तीला मोकळे रान मिळू शकते. मविआतील नेत्यांनी मात्र आरोप फेटाळून लावत हे वाटप पूर्णत: स्थानिक ताकद आणि संघटनशक्ती पाहून करण्यात आल्याचे सांगितले आहे. या युतीमुळे बहुजन, अल्पसंख्याक आणि पारंपरिक आघाडी मतदारांच्या एकत्रीकरणाचा फायदा होईल असा विश्वास या आघाडीच्या पदाधिका-यांनी व्यक्त केला आहे.

# १० वी बार.. फिरसे नितीश सरकार!


## बिहारच्या 'लाडक्या बहिणी' बनल्या नितीशकुमारांची ढाल

पाटणा / वृत्तसंस्था

नितीश कुमार दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री होण्याची शक्यता आता जवळपास निश्चित झाली आहे. बिहार निवडणुकीच्या निकालांवरून असे दिसून येते की बिहारमध्ये एनडीए पुन्हा एकदा प्रचंड बहुमताने सत्तेत येत आहे. भारतीय राजकारणात एखाद्या राजकारण्याला इतक्या दीर्घ काळासाठी जनतेचा पाठिंबा मिळणे दुर्मिळ आहे. मात्र, नितीश कुमार यांनी हे करून दाखवलं आहे. महिलांच्या खात्यात १०,००० रुपयांची रोख रक्कम हस्तांतरित करणे हे नितीश कुमार यांच्या १० व्या कार्यकाळात एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

महिलांच्या खात्यात १०,००० रुपयांची रोख रक्कम हस्तांतरित करणे हे बिहार निवडणुकीत नितीश कुमार यांच्यासाठी निर्णायक वळण ठरले, कारण त्यामुळे महिला मतदारांचा आत्मविश्वास वाढला आणि विरोधी पक्षाची रणनीती कमकुवत झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्याच्या २६ तारखेला ही योजना सुरू केली. यावेळी, त्यांनी ७.५ दशलक्ष महिला लाभार्थ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी १०,००० रुपये हस्तांतरित केले, हा आकडा नंतर १५ दशलक्ष झाला.

बिहार एनडीएने या योजनेला मुख्यमंत्री महिला रोजगार योजना असे नाव दिले आहे. नितीश सरकारने दावा केला की ही योजना स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. २९ ऑगस्ट २०२५




| पक्ष | 2025 | मते% | मागील स्थिती |
|---|---|---|---|
| NDA | 202 (+77) | 55.6% | 125 |
| महागठबंधन | 35 (-75) | 35.0% | 110 |
| जनसुराज | 0 (0) | 0.3% | NA |
| इतर | 6 (-2) | 9.1% | 8 |

रोजी, निवडणुकीच्या अगदी आधी, नितीश मंत्रिमंडळाने या योजनेला मंजुरी दिली. त्यानंतर विरोधकांनी सरकारवर मत खरेदीचा आरोप केला, परंतु निवडणूक निकालांवरून असे दिसून येते की या योजनेने नितीश सरकारविरुद्धचा सत्ताविरोधी लाट उलटून लावली आहे.नितीश कुमार यांची ही योजना निवडणुकीत गेम चेंजर ठरली. या योजनेअंतर्गत, १.५ कोटी महिलांच्या खात्यात १०,००० रुपये हस्तांतरित करण्यात आले. बिहारमध्ये महिला मतदारांची संख्या अंदाजे ३.६ कोटी आहे. महिला रोजगार योजनेचा लाभ १५ दशलक्ष महिलांना झाला, ज्याचा फायदा एनडीएला झाला. या निवडणुकीत एकूण महिला मतदारांपैकी ७१ टक्क्यांहून अधिक महिलांनी मतदान केले, ज्यामुळे एनडीएला फायदा झाला.




## राजद- भाजप आघाडीला स्पष्ट बहुमत

### एकदम महाराष्ट्र पॅटर्न! निकालाने धक्का बसण्याची गरज नाही – संजय राऊत

बिहार विधानसभा निवडणुकीचा अंतिम निकाल आज स्पष्ट होत आहे. यामध्ये एडीएला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे. तर महागठबंधनला अपयश मिळताना दिसत आहे. यावरून सध्या बिहारमध्ये भाजपकडून मोठा जल्लोष साजरा केला जात आहे. समोर येत असलेल्या या निकालांवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी ट्वीट करत प्रतिक्रिया दिली आहे. संजय राऊत आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हणाले, बिहाराच्या विधानसभा निवडणुका निकालाने धक्का बसण्याची गरज नाही. निवडणूक आयोग आणि भाजप यांचे हातात हात घालून जे राष्ट्रीय कार्य सुरू होते ते पाहता यापेक्षा वेगळा निकाल लागणे शक्य नव्हते, एकदम महाराष्ट्र पॅटर्न! जी आघाडी सत्तेवर येणार याची खात्री होती त्यांना ५० च्या आत संपवले.

# आ.संदीप भैय्याकडून नगराध्यक्ष पदासाठी सचिन आप्पा सोनवणेचे नाव जाहीर होण्याची शक्यता..!

## विजयासाठी सर्व समाजाकडून आप्पांच्या उमेदवारीची जोरदार मागणी

बीड प्रतिनिधी

नगर पालिकेची रणधुमाळी सुरु झाली असून बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचे अनेक इच्छुक उमेदवारांचे नावे समोर येत आहेत. सर्व पक्षाकडून इच्छुक नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) कडून देखील मुलाखती घेण्यात आल्या असून आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून सचिन आप्पा सोनवणे यांचे नगराध्यक्ष पदासाठी नाव जाहीर होऊ शकते.

आ.संदीप क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी भवन येथे सर्व समाजातील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांचे मते जाणून घेतली होती. त्यावेळी विशिष्ट समाजाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्याची मागणी होत असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी सर्व कार्यकर्त्यांना जातीचे राजकारण केले जाणार नसल्याचे ठणकावून सांगितले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून बौद्ध समाजातील सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.



बीड नगराध्यक्ष पदासाठी दोन्ही राष्ट्रवादी सह भाजप आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या आघाडीमध्ये जोरदार लढत होणार असून विकासाच्या मुद्द्यावर होणार असल्याचे बोलले जात आहे.

संदीप क्षीरसागर यांनी आमदार झाल्यापासून शहरात अनेक विकासाची कामे केली आहेत. या विकासकामुळे बीड शहराच्या वैभवात भर पडली आहे. त्यांच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी सचिन आप्पा सोनवणे यांचे नाव आघाडीवर असून सर्व समाजातून देखील त्यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी होत आहे.संदीप भैय्यांनी जर सचिन आप्पा सोनवणे यांना उमेदवारी दिली तर विजय पक्का अशी चर्चा बीड शहरात होताना पाहावयास मिळत आहे. सचिन सोनवणे हे देखील संदीप क्षीरसागर यांच्यासोबत एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहून काम करत आले आहेत. त्यांच्याकडे स्वच्छ प्रतिमेचा चेहरा आणि प्रामाणिक म्हणून पाहिले जाते. सर्व समाजात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. सर्व समाजात मिळून मिसळून राहणारे आणि सुखदुःखात धाऊन जाणारे सचिन आप्पा यांची ओळख आहे. त्यामुळे संदीप क्षीरसागर हे सचिन आप्पा सोनवणे यांनाच उमेदवारी देतील आणि बीड नगर पालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचा झेंडा फडकवतील यात तिळमात्र शंका नाही.



## संपादकीय

# दहशतवाद परतलाय...

राजधानी दिल्लीत भीषण बॉम्बस्फोट झाला आणि तोही अशा भागात जेव्हा दिवसाच्या प्रत्येक प्रहरी हा भाग गजबजलेला असतो. लालकिल्ल्याच्या ऐतिहासिक परिसरात भीषण बॉम्बस्फोट होऊन १४ जण ठार झाले, तर कित्येक जखमी झाले. या भागात पूर्वी दहशतवादी बॉम्बस्फोट घडवायचे. १४ वर्षांनंतर पुन्हा त्या भीषण आणि दहशतवादी दिवसांची आठवण ताजी झाली. गर्दीने गजबजलेला हा भाग आता मातम करण्यात बदलून गेलाय. दशकभराच्या कालावधीपासून सुखाने मार्गक्रमण करणाऱ्या लोकांच्या जीवनात या स्फोटाने उथलपुथल माजवली. लोक पुन्हा एकदा अशांत पर्व अनुभवत आहेत. या स्फोटाच्या अगोदर म्हणजे १० नोव्हेंबरला फरिदाबाद येथे एका काश्मिरी डॉक्टरला अटक करून त्याच्याकडून ३६० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. या घटनेचा सदर बॉम्बस्फोटाशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. पुलवामा येथे झालेल्या स्फोटाशी या स्फोटाच्या सूत्रधाराचा संबंध असावा असा संशय आहे. एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्थेने हा तपास आता हाती घेतला आहे आणि त्यातून नक्की काय ते समोर येईल. दहशतवाद्यांविरोधात आवश्यक ती पावले उचलली जात आहेत आणि यूएपीए म्हणजे पूर्वीचा टाडा कायदा दिल्ली परिसरात लागू करण्यात आला आहे. याचा अर्थ उघड आहे, तो म्हणजे दहशतवाद्यांना भारताची आगेकूच सहन होत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा दहशतवादाचा मार्ग अवलंबला आहे. पण हा भारत मोदी यांचा आहे. त्यामुळे येथे जशाला तसेच उत्तर दिले जाते.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानने भारताला पुन्हा आपण दहशतवादी हल्ले करून जेरीस आणू शकतो हे विसरून जावे कारण आता निषेधाचे पत्रक काढून शांत बसणारे सरकार नाही. आज वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत या हल्ल्यानंतर जी छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यावरून हे लक्षात येते, की दहशतवाद्यांनी स्फोट घडवल्यावर सर्वत्र अफरातफरीचे आणि गोंधळाचे वातावरण होते. पण सर्वच घटनांनंतर असेच घडते. या स्फोटानंतर जी बातमी येत आहे ती जास्तच धोकादायक आहे, ती म्हणजे आयसी ८१४ च्या अपहरणांतर दहशतवाद्याची अदलाबदल झाली. त्यानंतर असलेली जैश-ई-अहमद ही संघटना या स्फोटामागे असावी का, याचा विचार सुरू आहे. लालकिल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटामागे तीन पुरुष आणि एक महिला होत्या. ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतात घुसखोरी केली होती. या स्फोटामुळे भारताला चोख उत्तर द्यावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या भूतान दौऱ्यावर आहेत पण त्यांनी देशवासीयांना दिलासा दिला आहे, की दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले जाईल. ऑपरेशन सिंदूरच्या वेळेस पंतप्रधानांचे उत्तर किती चोख असते आणि दहशतवाद्यांना कसे त्यांचे सरकार त्यांच्या आकांपर्यंत जाऊन त्यांना धडा शिकवतात हे देशाने मागेच पाहिले आहे. त्यामुळे मोदी जे बोलतात ते करून दाखवतात यावर जनतेचा विश्वास आहे.

या स्फोटाची सूत्रधार मसूद अझरची बहीण शाहीन असल्याचे स्पष्ट झाले. तिचे एकच काम होते ते म्हणजे तरुणांना दहशतवादी कृत्ये करण्यास भाग पाडणे. दिल्ली धमाक्यांनंतर आता पाकिस्तानात घबराट पसरली आहे आणि हा दहशतवादी हल्ला होता. अर्थात हा सामान्य बॉम्बस्फोट नाही. सुरुवातीच्या तपासात ही बाब समोर आली आहे, की शाहीनने घाई गडबडीत लोकांना ठार मारण्याचा कट घडवण्यात आला. पाकिस्तान या हल्ल्यामुळे पॅनिक मोडमध्ये आहे आणि नरेंद्र मोदी स्फोटाला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाहीत असे सांगत आहेत. मोदी म्हणाले, की या षड्यंत्राला जबाबदार असलेल्यांना सोडणार नाही आणि त्यांच्या या म्हणण्याला अर्थ आहे.

# धारूर मध्ये मुलाखती पूर्ण झाल्या तरी

# नगराध्यक्ष पदाचे उमेदवारे गुलदस्त्यातच

## मतदारांमध्ये उत्सुकता, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी चार दिवसांचा कालावधी शिल्लक

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारूर मध्ये नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रमुख पक्षांच्या मुलाखती पूर्ण झाले आहेत परंतु कोणत्याही पक्षांनी अधिकृतरित्या आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार हा असेल असे जाहीर केलेले नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ चारच दिवस शिल्लक आहेत. तरी देखील आणखीही नगरसेवक, नगराध्यक्ष प्रमुख पक्षांचे निवडले गेलेले नाहीत हे गुलदस्त्यातच असल्याचे बोलले जात आहे.

धारूर नगर परिषदेसाठी प्रमुख पक्ष भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, शिवसेना एकनाथ शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस हे पक्ष निवडणुकीसाठी आपापले उमेदवार उभे करणार आहेत परंतु आणखीही नगरसेवक व नगराध्यक्ष पद जाहीर केलेले नाही यामुळे उमेदवारांमध्ये संभ्रम अवस्था आहे कोणाला तिकीट मिळणार व कोणाचे तिकीट कापले जाणार हे येणाऱ्या दिवसांमध्ये समजणार आहे.




भारतीय जनता पार्टी भाजपा हा धारूर नगरपरिषद निवडणुकीसाठी एक प्रमुख पक्ष असून सगळ्यात मोठा पक्ष आहे या पक्षाची सत्ता नगरपरिषदेवर अनेक वर्ष आहे सद्यस्थितीत भाजपा पक्षाने कमालीची गुप्तता पाळलेली असून नगरसेवक व नगराध्यक्ष पद आणखीही उमेदवार निश्चित केलेले नाहीत. त्यांची वरिष्ठांश चर्चा सुरू असल्याचे समजत आहे. उद्या त्यांचा उमेदवार निश्चित होत असल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट धारूर नगर परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट हा एक प्रमुख पक्ष असणार आहे येथे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून अर्जुनराव गायकवाड यांनी प्रचार सुरू केला आहे तेच उमेदवार निश्चित असतील असे बोलले जात आहे परंतु त्यातच याच पक्षातील काही पदाधिकाऱ्यांकडून सोशल मीडियावर वेगळी चर्चा सुरू आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट धारूर नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट हा एक प्रमुख पक्ष आहे धारूर तालुक्याचे नेतृत्व माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके करतात ते या पक्षाचे सद्यस्थितीत निवडणुकीसाठी सर्वेसर्वा आहेत त्यांनी आत्ताच इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या असून उद्या नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ते जाहीर करतील असे बोलले जात आहे या पक्षाकडून बालासाहेब जाधव, नितीन शिनगारे, डॉ मयूर सावंत यांच्यापैकी एकाची निवड पक्ष नेतृत्व करणार का आणखी कोणाला संधी देणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. शिवसेना एकनाथ शिंदे गट नगरपरिषद निवडणुकीसाठी शिवसेना एकनाथ शिंदे गट यामध्ये अपक्ष उमेदवार सुरेश गवळी हे प्रवेश करणार असल्याने आता हा पक्ष एक प्रमुख पक्ष म्हणून धारूर नगरपरिषद निवडणुकीसाठी उतरणार असल्याचे समजत आहे यांच्याकडून सुरेश गवळी हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असतील तर नगरसेवक पदाचेही उमेदवार लवकरच जाहीर होऊन हा पक्ष निवडणुकीसाठी जोमाने उतरणार असल्याचे बोलले जात आहे.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७७/२०२५**
मंदाबाई विष्णु जगधने वि.निरंक
**(मार्फत-अॅड.एम.वाय.इनामदार, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **विष्णु पि.आसाराम जगधने हे दि.२२.०२.२०२५ रोजी धोंडराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. मंदाबाई भ्र.विष्णु जगधने, वय-४४ वर्षे, धंदा-शेती, रा.धोंडराई ता.गेवराई जि.बीड, २.अशोक पि.विष्णु जगधने, वय-२२ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३.दिपक पि.विष्णु जगधने, वय-१९ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ४.सचिन पि.विष्णु जगधने, वय-१८ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **विष्णु पि.आसाराम जगधने** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२७/१०/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०१/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२४/२०२५**
हनुमंत बप्पासाहेब काचुळे व इतर
**(मार्फत-अॅड.बी.ई.खरात, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **कौसाबाई उर्फ कौशल्या भ्र.बप्पासाहेब काचुळे, रा.आमला ता.गेवराई जि.बीड हे दि.०६.०३.२०२५ रोजी रा.आमला ता.गेवरवाई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.हनुमंत पि.बप्पासाहेब काचुळे, वय-३४ वर्षे, धंदा-शेती, रा.आमला ता.गेवरवाई जि.बीड, २.विजय पि.बप्पासाहेब काचुळे, वय-३७ वर्षे, धंदा-नौकरी, रा.सदर, ३.बप्पासाहेब पि.मुक्ताराम काचुळे वय-७५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **कौसाबाई उर्फ कौशल्या भ्र.बप्पासाहेब काचुळे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१२/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२२/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२३/२०२५**
राम नाथा घोडके वि.निरंक
**(मार्फत-अॅड.आर.एल.गवारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **मंकाबाई भ्र.नाथा घोडके हे दि.११.०१.२०२५ रोजी सुशी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.रामु पि.नाथा घोडके, वय-६८ वर्षे, ता.गेवराई जि.बीड, २.सागरबाई भ्र.आश्राजी खरात वय-८० वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा.सुशी ता.गेवराई जि.बीड, ३.मालणबाई भ्र.नानासाहेब तिळवणे, वय-६२ वर्षे, धंदा-शेती, रा.गोरी ता.अंबड जि.जालना, ४.मनोहर पि.जनार्धन घोडके वय-४५ वर्षे, धंदा-शेती, रा.सुशी ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मंकाबाई भ्र.नाथा घोडके** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -१७/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १००
दिनांक : १२/११/२०२५
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार राधा धोंडीभाऊ पांजगे रा.शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना**

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. श्रीमती राधा धोंडीभाऊ पांजगे रा.शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू राधा धोंडीभाऊ पांजगे** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-०१/०७/१९८८** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०४
दिनांक : ०६/११/२०२५
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार अर्जुन रामप्रसाद काकडे ता.कंडारी परतुर जि.जालना**

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **कंडारी परतुर ता.घनसावंगी जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. श्रीमती अर्जुन रामप्रसाद काकडे रा.कंडारी परतुर ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू अक्षरा अर्जुन काकडे** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-२३/०८/२०२०** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक -/-/- रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३१/२०२५**
मनिषा रंगनाथ लेंडाळ वि.निरंक
**(मार्फत-अॅड.ए.बी.बांगर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **रंगनाथ पि.तुकाराम लेंडाळ हे दि.१५.०७.२०२५ रोजी दैठण ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.मनिषा भ्र.रंगनाथ लेंडाळ, वय-३४ वर्षे, धंदा-शेती, रा.दैठण ता.गेवराई जि.बीड, २.छबुबाई भ्र.तुकाराम लेंडाळ, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रंगनाथ पि.तुकाराम लेंडाळ** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१३/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -१७/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२८/२०२५**
चेतन लहुराव शिंगाडे विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.ए.बी.बांगर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **लहुराव विठ्ठलराव शिंगाडे हे दि.२९.०९.२०२५ रोजी सिध्दीविनायक नेत्रालय बीड ता.जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. चेतन पि.लहुराव शिंगाडे, वय-३४ वर्षे,धंदा-शेती, रा.आंतरवाली बु. ता.गेवराई जि.बीड, २.अविनाश पि.लहुराव शिंगाडे वय-३५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३.साधना भ्र.अजिनाथ भोंडवे, वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.पिट्ठी ता.पाटोदा जि.बीड, ४. शांताबाई भ्र.विठ्ठलराव शिंगाडे, वय-८० वर्षे, धंदा-घरकाम, रा.आंतरवाली बु. ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लहुराव विठ्ठलराव शिंगाडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१३/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -०७/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४४९ दि.१४.११.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **युवराज शाम राठोड, रा.बारसवाडा तांडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युवराज शाम राठोड | स्वतः | २२.११.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- ९८
दिनांक : २५/०९/२०२५
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री वजीर निजाम शेख रा.श्रीपत धामणगांव ता.घनसावंगी जि.जालना**

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **श्रीपत धामणगांव ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. वजीर निजाम शेख रा.श्रीपत धामणगांव ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू इब्राहीम वजीर शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१७/०७/२००३** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- ९९
दिनांक : २५/०९/२०२५
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार श्री वजीर निजाम शेख रा.श्रीपत धामणगांव ता.घनसावंगी जि.जालना**

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **श्रीपत धामणगांव ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. वजीर निजाम शेख रा.श्रीपत धामणगांव ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू सादिक वजीर शेख** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१७/०९/२०११** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०९/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि- १०१
दिनांक : ०६/११/२०२५
वाचा :- जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम-२०२३

**अर्जदार महेश गुलाबराव पोकळे रा.शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना**

### जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म - मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता **शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, **श्री/श्रीमती/कु/कुमारी. महेश गुलाबराव पोकळे रा.शिंदे वडगांव ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/नातू महेश गुलाबराव पोकळे** यांची त्यांनी जन्म ची **दिनांक:-१७/०८/२००४** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य–राजशक्ती



# दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीवर अजित पवार स्पष्टच बोलले अंजली दमानियांच्या मागणीलाही उत्तर

**पुणे (प्रतिनिधी)**

**पुणे जमिन खरेदी गैरव्यवहार प्रकरणावरून अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राजीनाम्याचीच मागणी केली. अजित पवारा हे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री आहे. त्यामुळे निष्पक्ष चौकशी कशी होणार? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला.**

दरम्यान अंजलि दमानिया यांच्या मागणीला दादांनी पुण्यात उत्तर दिले आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस युती करणार यावर देखील ते व्यक्त झाले आहेत. ते पुण्यात माध्यमांशी बोलत होते. आगामी निवडणुकांसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस युती करणार का? यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, आज मला पुण्यातले स्थानिक पदाधिकारी, दोन्ही शहराध्यक्ष सगळे माजी नगरसेवक आणि आमदार भेटले. त्यांना मी सांगितलं आहे की, तुम्ही चाचणी करा मी परत दोन दिवसांनी येतो आणि त्याबद्दल निर्णय घेऊ. अजून महानगरपालिकेचा कार्यक्रम जाहीर झाला नाही.

त्यामुळे काय काय होतं आणि कसं कसं होतं ते पहावं लागेल. निवडणुका होऊन खूप दिवस झाले आहेत. आज आम्ही महायुतीमध्ये आहोत महायुतीमध्ये आमचं काम सुरू आहे. पण आता नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका सुरू आहेत. कुठल्या कुठल्या शहरात काय काय घडतं हे साधारण लवकर समजेल अंदाज येईल. अंदाज आला की पुढच्या गोष्टी ठरवता येतील. माझं शरद पवार साहेबांशी बोलणं झालं नाही. कार्यकर्ते त्यांच्या भावना मांडत असतात, मी सगळ्या भागातल्या सहकार्यांना सांगितलं आहे की तुम्ही चाचपणी करा आणि ठरवा.. आम्ही पहिली निवडणुक लढत नाहीत आम्ही लोकांनी अशा कित्येक निवडणुका लढल्या आहेत हे आम्हाला नवीन नाहीत आमच्यामध्ये एकोपा राहुन निवडणुका लढू. सगळ्या सहकार्यांशी चर्चा करू आणि युतीबाबत काय तो योग्य निर्णय घेऊ. आम्ही आच्या पक्षाचे बघू तुम्ही काळजी करू नका.

मला योग्य वाटेल ते मी करेल:



गेवराई (प्रतिनिधी)

सध्या गेवराई शहरांमध्ये नगर परिषद निवडणूकीचा प्रचार चांगलाच रंगात आलेला आहे. नगराध्यक्ष पदासाठी सौ. शितल महेश दाभाडे यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या महिला आघाडीच्या महिला रणरागिणी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरभर प्रचार रॅली काढून मतदारांशी संपर्क करत आहेत. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१४८२ दि.१४.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **संकेत सुदाम इंगोले, रा.साडेगांव ता.अंबड** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | संकेत सुदाम इंगोले | स्वतः | १०.०२.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– १४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## जाहिरनामा

**मा.श्रीमती एस.डी.सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश**
**व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६५९/२०२५**
**लक्ष्मी देवडकर वि. निरंक**
**विधीज्ञ श्री. एस. व्ही. किंबहुणे**

मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः

१. लक्ष्मी भ्र. गोरक्षनाथ देवडकर, वय: ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाथापूर ता. जि. बीड

२. मनिषा भ्र. रमेश औढकर, वय: ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. रांजनी, ता. गेवराई, जि. बीड

३. भाग्यश्री भ्र. बाळासाहेब इंदलकर, वयः २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंतरवली, ता. गेवराई, जि.बीड

४. अनिता भ्र. तानाजी वायकर, वयः २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सारणी सांगवी, ता. केज, जि. बीड

५. मनिषा पि. गोरख उर्फ गोरक्षनाथ देवडकर, वय: २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. नाथापूर, ता. जि. बीड

६. कार्तिकी पि. गोरख उर्फ गोरक्षनाथ देवडकर, वयः १२ वर्षे, धंदाः शिक्षण अज्ञान, अर्जदार क्र. १ लक्ष्मी भ्र. गोरक्षनाथ देवडकर रा. वरीलप्रमाण.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे गोरख उर्फ गोरक्षनाथ पि. नारायण देवडकर राहणार रा. नाथापूर, ता. जि.बीड हे दिनांक १३/०९/२०२५ रोजी बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ या मयताच्या विवाही मुली असून अर्जदार क्र. ५ व ६ हया अविवाहीत मूली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे गोरख उर्फ गोरक्षनाथ पि. नारायण देवडकर यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत गोरख उर्फ गोरक्षनाथ पि. नारायण देवडकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ११/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**स्वाक्षरित/–**
**क.लिपीक**
**सह.दिवाणी न्यायालय**
**व.स्तर,बीड**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/–**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

---

## तहसील कार्यालय, कळंब

**जा.क्र. २०२५ / मह/दंडणीय/कावी–दिनांक २९/०९/२०२५**

## जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, पा कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांचेमार्फत श्री साजीद जमील अहेमद फारोकी रा. शिराढोण ता कळंब जि, धाराशिव यांनी त्यांची मुलगी अलिशा साजीद फारोकी यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शिराढोण ता कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. २५/०१/२०११ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. ३१/०७/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
जा.क्र.२०२५/एम ए जी /कावि– ६२
दिनांक : २४/१०/२०२५

वाचा :– जन्म आणि मृत्यु नोंदणी (सुधारणा) अधिनियम–२०२३

अर्जदार. श्री. प्रकाश अप्पासाहेब धबडकर रा. मांदला
ता. घनसावंगी जि.जालना

## जाहीर प्रगटन

कलम १३ (३) जन्म – मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म – मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.

सर्व जनता मौजे मांदला ता. घनसावंगी यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री/श्रीमती/कु/कुमारी. प्रकाश अप्पासाहेब धबडकर रा. मांदला ता.घनसावंगी जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे श्री/श्रीमती/कु/नातू निलेश दत्ता शिंदे यांची त्यांनी जन्म ची दिनांक:–०६/०४/२०१० ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/१०/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी.**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२०/२०२५**
अर्जुन वामनराव धुरंधरे वि.निरंक
**(मार्फत–अॅड.बांगर ए.बी.)**

ज्याअर्थी मयत नामे **जिजाबाई वामनराव धुरंधरे हे दि.२७.०८.२०२४ रोजी मौजे मादळमोही ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. अर्जुन वामणराव धुरंधरे, वय–६८ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही वामनराव धुरंधरे वय–५९ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड, ३.आसराबाई रामभाऊ सकट वय–७९ वर्षे, धंदा–घरकाम, रा.मादळमोही गेवराई जि.बीड**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जिजाबाई वामनराव धुरंधरे, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१५/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८९४/२०२५**
संगीता बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख वि.भागवत बंडू उर्फ प्रल्हाद देशमुख
**(मार्फत–अॅड.वावरे ए.के.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **बंडू पि.विठ्ठलराव देशमुख, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड हे दि.०५.११.२०२३ रोजी रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. संगीता भ्र.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख,वय–४२ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड, ह.मु.प्लॉट नं.३० हिंगणा रोड, राजगृह नगर, नागपुर सिटी इंदल अरे नागपुर, ता.जि.नागपुर, २. संग्राम पि.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख, वय–२२ वर्षे, धंदा–शिक्षण, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड, गैरअर्जदार–१.भागवत पि.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख वय–२४ वर्षे, धंदा–शेती, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बंडु पि.विठ्ठलराव देशमुख** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०६/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१२/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–११९१ दि.१२.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नारायण भाऊसाहेब वीर, रा.भगवान नगर, महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिध्दार्थ नारायण वीर | मुलगा | १६.०५.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१११८ दि.०७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नारायण शेषराव कणके, रा.एकलहेरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवम नारायण कणके | मुलगा | १८.०७.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–८१८ दि. . .२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुसा निजाम सय्यद, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हिना मुसा सय्यद | मुलगी | ०१.०३.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–११५० दि. . .२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **माजीदखान अहमद खान , रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | माजीदखान अहमद खान | स्वतः | १५.०४.१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–९२९ दि. . .२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अहमदखाँ चाँद खाँ पठाण, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अहमदखाँ चाँद खाँ पठाण | स्वतः | ०५.०५.१९६३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–८९६ दि. –.–.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अकिल युनूस शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अकिल युनूस शेख | स्वतः | २३.०९.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–८१९ दि. –.–.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अनिस मुसा सय्यद, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनिस मुसा सय्यद | स्वतः | १५.०५.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–११२२ दि. १३.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नारायण शेषराव कणके, रा.एकलहेरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडिल**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेषराव शिवनाथ कनके | वडील | ०३.०१.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/ –/– रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# गेवराई नगरपरिषद: शिंदे सेनेचा स्वबळाचा नारा सर्व जागांवर उमेदवार

## नगराध्यक्ष पदासाठीही स्वतंत्र उमेदवारी

गेवराई (प्रतिनिधी) : आगामी गेवराई नगरपरिषद निवडणुकीत शिंदे गटाने स्वबळावर लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी ही भूमिका स्पष्ट केली. नगराध्यक्षापदासह सर्वच जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय शिंदे सेनेने घेतल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील शिवसेना कार्यालयात पार पडलेल्या पत्रकार परिषदेला शहराध्यक्ष मुकेश महाजन, उपजिल्हाप्रमुख नारायण शिंदे, उमेश शिंदे, गणेश पवार, तालुकाप्रमुख उद्धव मडके,ओमप्रकाश नारनाळे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी बोलताना नवले म्हणाले, आम्ही शिवसेनेतच आहोत. नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठीही आम्ही स्वतंत्र उमेदवार देणार आहोत. निवडणुकीत इतर घटक पक्षांसोबत संवाद सुरू आहे. माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार हेही गेवराईत एकत्र काम करत आहेत. राष्ट्रवादीनेही आपला उमेदवार दिला आहे. त्यामुळे आम्ही आता स्वबळावर उमेदवारी देत आहोत.

नवले यांनी सांगितले की, गेवराईतील जुने शिवसैनिक आजही पक्षात सक्रिय असून, ते मोठ्या उत्साहाने निवडणूक लढविण्यासाठी कार्यरत राहतील, असा त्यांना विश्वास आहे. यासोबतच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वरिष्ठ नेत्यांच्या सभा घेऊन प्रचाराला वेग देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.शिंदे सेनेच्या या घोषणेमुळे गेवराई नगरपरिषद निवडणुकीत तिरंगी लढतीची शक्यता वाढली असून, आगामी राजकीय समीकरणांबाबत स्थानिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

# आवरगाव येथे महिलांची ग्रामसभा व डस्टबिन वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत आवरगाव येथे महिलांची विशेष ग्रामसभा आणि स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी डस्टबिन वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.ग्रामसभेच्या प्रारंभी आदर्श सरपंच अमोल जगताप यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उद्देश स्पष्ट करताना महिलांच्या सहभागातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, गावाच्या स्वच्छतेपासून ते विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

यानंतर आदर्श ग्रामसेवक बाळासाहेब झोंबाडे यांनी उपस्थितांना ग्रामविकास योजनांची




माहिती देत गावातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेबाबत जबाबदारी स्वीकारावी असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, डस्टबिन वाटप हा केवळ एक कार्यक्रम नसून स्वच्छतेची सवय लावण्याचा सामूहिक प्रयत्न आहे.

या कार्यक्रमात गावातील महिलांना घरगुती कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी डस्टबिन वाटप करण्यात आले. या माध्यमातून स्वच्छ गाव – समृद्ध गाव हा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला.कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे सदस्य, गावातील नागरिक, विविध महिला बचतगटांच्या प्रतिनिधींसह मोठ्या संख्येने माताभगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत आवरगावतर्फे करण्यात आले असून ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली तो यशस्वीरीत्या पार पडला.गावातील महिलाना कपडे धुण्यासाठी धोबी घाट सुद्धा बांधण्यात आला असून हा धोबीघाट सुद्धा आज लोकारपित करण्यात आला आहे, गावात तुळजाभवानीचे मंदिर सुद्धा नव्याने उभा करण्यात आले आहे त्याची पाहणी सुद्धा करण्यात आली. गावकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत, ग्रामपंचायतीच्या स्वच्छता आणि विकास या दुहेरी संकल्पनेला आपला पूर्ण पाठिंबा दर्शविला.

# नेमका कुठल्या वक्तव्याचा खुलासा करू- रुपाली ठोंबरे:आपल्याच पक्षाला मागितले खुलासा पत्र

पुणे /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यातील वाद शिगेला पोहोचला आहे. रूपाली पाटील यांनी थेट चाकणकर यांच्या विरोधात आंदोलन करत राजीनाम्याची मागणी केल्यानंतर पक्षाने गंभीर दखल घेत रूपाली पाटील यांना पक्षाकडून आपल्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का करू नये, असे पत्र पाठवून सात दिवसांत उत्तर द्यावे, असे सांगितले. त्यावर रूपाली पाटील यांनी पक्षाच्या प्रदेश कार्यालयास नेमका कुठल्या वक्तव्याचा खुलासा केला पाहिजे?' असे पत्र पाठवले आहे.

याबाबत रुपाली ठोंबरे म्हणाल्या, पक्षाने मागितलेल्या खुलासा पत्रात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष व प्रदेशाध्यक्ष यांच्या बाबतीत प्रसारमाध्यमात केलेले वक्तव्य पक्षशिस्त भंग करणारे आहे व त्यासंर्दभात शिस्तभंगाची कारवाई का करू नये याबाबत मला खुलासा पत्र मागितले आहे. नेमके संबंधित व्यक्तींबाबत मी कोणते वक्तव्य शिस्तभंग करणारे केले आहे, ते सांगावे. याबाबत नोटीसमध्ये कोणतीही माहिती नसल्याने त्यासंर्दभात



खुलासा देणे शक्य नाही. सविस्तर एखादे वाक्य नोटिसीमध्ये नमूद केले असते तर त्यावर मला खुलासा करणे शक्य झाले असते. तसेच राज्य महिला आयोग व राष्ट्रीवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष स्वतंत्र विभाग आहे. फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांनी जे वक्तव्य केले होते. त्यात समाजात व लोकांत अत्यंत रोष व असंतोष निर्माण झाल्याचे दिसून येते.

राज्य महिला आयोगाने केलेल्या वक्तव्याने पक्षालादेखील लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. पक्षाची बदनामी झाल्याने मी स्वत: बीड येथे महिला डॉक्टरच्या कुटुंबाची भेट घेतली. पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्याशीदेखील कुटुंबाचे बोलणे मी करून दिले होते. मी केवळ राष्ट्रीय अध्यक्षांच्या मताचा सन्मान करून माझे म्हणणे मांडले होते. राष्ट्रीय अध्यक्षांची बाजू मांडणे प्रवक्त्यांचे काम असल्याने ही नोटीस मला का देण्यात आली याबाबत कोणती कल्पना नाही. मी कोणताही शिस्तभंग केलेला नाही.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यातील वाद शिगेला पोहोचला आहे.

# नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यकता नाही

## शनिवारी (ता. १५) देखील नामनिर्देशनपत्र स्वीकारणार

मुंबई (प्रतिनिधी)

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टिकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने हीींिं:// ारहरीशलशश्रशल.ळप हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या




निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत (झीळपीं जीीं) काढून त्यावर उमेदवाराची स्वत:ची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणापत्र, निवडणुकीसाठी बँक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जातप्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र- १' किंवा 'जोडपत्र- २' इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.

इच्छूक उमेदवारांना नोंदणीसाठी सुरुवातीपासून सुरू केलेले संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू असेल. तोपर्यंत त्यावर इच्छूक उमेदवारांना कोणत्याही वेळी नोंदणी करता येते व नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा लागतो. कारण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी ते आवश्यक असते. सही केलेल्या प्रिंटआऊटसह आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांचा संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र शनिवारी, १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा स्वीकारण्यात यावेत, अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र रविवारी (ता. १६) ते स्वीकारण्यात येणार नाहीत. इच्छूक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना देण्यात आले आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे.

# नवले पुलावर कंटेनरने अनेक वाहनांना उडवले

पुणे (प्रतिनिधी)

पुण्यातील नवले पुलावर आज भयंकर अपघाताची घटना घडली. नवले पुलावर भरधाव कंटेनरने १० ते १२ वाहनांना जोरदार धडक दिली. कंटेनरने अनेक वाहनांना धडक दिल्यानंतर पेट घेतला. यावेळी दुर्घटनाग्रस्त वाहनांना देखील आग लागली. या अपघातामध्ये ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे- बंगळुरू महामार्गावर अपघाताची ही भयंकर घटना घडली. या अपघातामध्ये अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर नवले पुलावर काचांचा ढीग, पेटलेली वाहनं, कारचा चुराडा झाल्याचे चित्र पहायला मिळाले. सध्या पोलिस, स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाकडून मदतकार्य आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील नवले पुलावर आज संध्याकाळी भीषण अपघात घडला.एका भरधाव कंटेनरने अनेक वाहनांना धडक देत एका ट्रकला धडक दिली. कंटेनरने कार, दुचाकी आणि ट्रक अशा १० ते १२ वाहनांना धडक दिली. या अपघातामध्ये वाहनांचा

**आगीच्या भक्ष्यात दुर्घनाग्रस्त वाहनं आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू**



चक्काचूर झाला. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतां पैकी कित्तेकांचा आगीमध्ये होरपळून अक्षरश: कोळसा झाला. प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार, साताराहून पुण्याच्या दिशेने हा कंटेनर येत होता. नवले पुलावरून खाली उतरत असताना चालकाचे कंटेनरवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर या कंटेनरने समोर येईल त्या वाहनांना धडक दिली. या अपघातामुळे रस्त्यावर काचांचा ढिग पडला होता. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले. तर मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. या अपघातामुळे पुणे- बंगळुरू महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नगरपरिषद निवडणूकच्या पुर्व तयारी बाबत अंबाजोगाई, परळी वैजनाथ व किल्ले धारूर नगर परिषदांना प्रत्यक्ष भेटी देऊन आढावा घेतला

बीड /प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यात्तील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीं मधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला आहे.बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत.

निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात आलेली आहे.त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी आज दिनांक १४.११.२०२५ रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पुर्व तयारी बाबत अंबाजोगाई, परळी वैजनाथ व किल्ले धारूर नगर परिषदांना प्रत्यक्ष भेटी देऊन आढावा घेण्यात आला आहे.भेटी दरम्यान नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचे स्थळ, स्टॉग रूम, एक खिडकी योजना, मतमोजणी ठिकाणाची पाहणी करून निवडणूक निर्णय अधिकारी यांना राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेश / सूचना नुसार निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थीत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवडणूकोसाठी आवश्यक मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व मतमोजणी अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्तीचा आढावा घेऊन त्यांना परिपूर्ण प्रशिक्षण तसेच हॅन्डस ऑन ट्रेनिंग च्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

तसेच SST, VST. FST या पथकाच्या कामकाजाची पाहणी करून आदर्श आचारसंहितेची



प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या व आचारसंहितेचे उल्लंघन करणा-या विरूद्ध कडक कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे निवडणूक प्रचारासाठी आवश्यक असणाऱ्या विविध परवाने एकसमान तत्वावर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार देण्यातबाबत सुचना दिलेल्या आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील सूचनाप्रमाणे मतदान केंद्रावर आवश्यक त्या किमान सुविधा उपलब्ध करून देणबाबत तसेच संवेदशील मतदान केंद्रावर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी वेब कास्टींग व सीसीटीव्ही लावणेबाबत आदेशित केले.

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदार जनजागृती अभियान संपूर्ण शहरात व विशेषतः मागील निवडणुकीत ज्या प्रभागात / मतदान केंद्रांवर कमी मतदान झाले होते तेथे भर देण्याबाबत निर्देश दिले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# धारूर नगरपरिषद निवडणूक : राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची अधिकृत घोषणा



**आमदार प्रकाश सोळंके यांची पत्रकार परिषद - नगराध्यक्ष पदासाठी बालासाहेब जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब**

प्रतिनिधी । धारूर

धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने मोठा राजकीय फटका देत नगराध्यक्ष तसेच सर्व दहा प्रभागांतील नगरसेवक पदांचे उमेदवार जाहीर केले आहेत. शुक्रवारी सकाळी झालेल्या पत्रकार परिषदेत आ . प्रकाश सोळंके यांनी ही महत्वाची घोषणा केली. निवडणुकीस अवघे काही दिवस शिल्लक असताना पक्षाने उमेदवारीची यादी जाहीर करून इतर पक्षांपेक्षा तयारीत स्पष्ट आघाडी घेतली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी बालासाहेब रामराव जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला. यासोबतच दहा प्रभागांतील एकूण २० उमेदवारांची अंतिम यादीही जाहीर करण्यात आली. महिला, मागासवर्ग, अनुसूचित जाती तसेच सर्वसाधारण प्रवर्गांना न्याय देत संतुलित पॅनेल तयार करण्याचा पक्षाचा प्रयत्न स्पष्ट झाला.

प्रभागनिहाय उमेदवारीमध्ये प्रभाग एक मध्ये सुनिता चव्हाण (महिला सर्वसाधारण), शेख गफार (सर्वसाधारण) ,प्रभाग दोन मध्ये सौ. उषा गावसमुद्रे (एससी महिला), नितीन शिनगारे (सर्वसाधारण) ,प्रभाग तिनमध्ये सौ. ज्योती गायसमुद्रे (एससी महिला), सुरज कोमटवार (सर्वसाधारण) ,प्रभाग चारमध्ये डॉ. आकांक्षा फावडे (मागासवर्ग महिला), शांताबाई कावळे (सर्वसाधारण) ,प्रभाग पाचमध्ये आनंत चिंचाळकर (मागासवर्ग), शेख हुमा गयासोद्दीन (महिला सर्वसाधारण) ,प्रभाग सहमध्ये बानुबेगम सय्यद (महिला सर्वसाधारण), सय्यद हारुण (सर्वसाधारण) ,प्रभाग सातमध्ये आवेज कुरेशी (मागासवर्ग), संगीता भावठाणकर (महिला सर्वसाधारण) ,प्रभाग आठमध्ये सुप्रिया जाधव (मागासवर्ग महिला), गणेश सावंत (सर्वसाधारण) ,प्रभाग नऊ मध्येअश्विनी गायके (मागासवर्ग महिला), सुधीर शिनगारे (सर्वसाधारण) ,प्रभाग दहा मध्ये लक्ष्मण सिरसट (एससी), सौ. भूमीका वैरागे (महिला सर्वसाधारण) यांचा समावेश आहे

पत्रकार परिषदेत बोलताना आमदार सोळंके म्हणाले, इच्छुकांना वेटिंगवर ठेवण्यापेक्षा किंवा संभ्रमात न ठेवता सर्वांना विश्वासात घेऊन वेळेआधीच उमेदवार जाहीर केले आहेत. संघ मजबूत करण्याचा हा निर्णय पक्षाच्या एकतेसाठी महत्त्वाचा आहे.

यावेळी त्यांनी नगरपालिकेची सत्ता मिळाल्यास धारूर शहराचा सर्वांगीण विकास प्राधान्याने करण्यात येईल, असे आश्वासन दिले. हद्दवाढ, स्वच्छ पाणीपुरवठा, शहर स्वच्छता, तसेच ऐतिहासिक किल्ल्याच्या डागडूजीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचे त्यांनी सांगितले. मागील काळात विकासकामे ठप्प झाल्याची टीका करत आगामी पाच वर्षे धारूरला नवे रूप देण्याचे त्यांनी आश्वासन व्यक्त केले

# नियमानुसार गाळपपूर्वी दर जाहीर करा- कृती समिती

**एक रकमी एफआरपी भाव देण्याची मागणी**



परळी / प्रतिनिधी

ऊस गाळप हंगाम सुरू झाला असून अनेक साखर कारखाने ऊस गाळपाकरिता घेऊन जात आहेत मात्र जिल्ह्यातील एक ही साखर कारखान्याने ऊस दर जाहीर करणे बंधनकारक असताना देखील दर जाहीर न केल्याने ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीच्या शिष्टमंडळाने ओंकार शुगर, २०-२० शुगर या साखर कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांची भेट घेत ऊस दर जाहीर करण्याची लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

यंदाच्या खरीप हंगामात झालेली अतिवृष्टी, खतांच्या किमतीत होणारी वाढ, वाढते मजुरीचे दर, ऊस पिकावर होणारा विविध रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी होणारा खर्च, यामुळे ऊस उत्पादनासाठी खर्चात वाढ झाली असून ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.

या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी उसाला एफ.आर.पी. दर ४००० रु. देण्यात यावा, नियमानुसार ऊस गाळप सुरू करण्यापूर्वीच कारखान्यांनी ऊस दर जाहीर करावा जेणेकरून ऊस कोणत्या कारखान्यास द्यायचा हे ठरवण्यास शेतकऱ्यांना सोपे होईल.एक रकमी एफआरपीदर शेतकऱ्यांना ऊस गेल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत वितरित करावेत. ऊस कारखान्यांकडून होणारी उसाच्या वजनाची व रिकव्हरीची चोरी रोखावी, शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कोणतेही प्रकारची कपात करण्यात येऊ नये. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस उपलब्ध असताना अवाजवी पणे लांबून वाहतूक करून ऊस गळपास आणू नये व विनाकारण वाहतूक खर्च वाढवू नये या मागण्याकरिता ऊस उत्पादक शेतकरी कृती समितीचे कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, दत्ता गव्हाणे, बळीराम मुंडे, ईश्वर सोनवणे, कॉ.भगवान बडे, सुमंत उंबरे आदी शिष्टमंडळाने साखर कारखानदाराकडे केली आहे.

# सांगवी (पा.) येथे श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात संपन्न



आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थिती मध्ये श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा १२ ते १३ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवशी उत्साहात साजरा झाला. भक्तिमय वातावरण, धार्मिक कार्यक्रमांची चुरस, भजनी मंडळांचा सहभाग आणि महाप्रसादाच्या महिमा यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या दिवशी बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता क्षेत्र काशी, पैठण, नागतळा येथून आलेल्या कावडींची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर कावड निवड कार्यक्रम पार पडला. रात्री ९ ते १० दरम्यान विनोदाचार्य ह. भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर यांनी भाविकांना कीर्तनातून अध्यात्म आणि भक्तीची प्रेरणा दिली. रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत काशीनाथ जाधव व सहकारी यांनी नाथजन्म आख्यान सादर केले. मध्यरात्री १२ वाजता श्रींचा लघुरुद्राभिषेक, पुष्पवृष्टी व कावडीचे पाणी असा प्रमुख सोहळा संपन्न झाला. गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ९ या वेळेत ग्रामस्थांकडून नैवेद्य, नारळ, शेरणी वाटप करण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह. भ. प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्रीयांचे हरिकीर्तन झाले. यावेळी ह. भ. प. सुदर्शन महाराज, युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, विजय गोल्हार, संजय गाढवे, रावसाहेब लोखंडे, उद्योजक पांडुरंग सोनवणे , शत्रुघ्न मरकड, पी. आय. बाबासाहेब चव्हाण, सरपंच दत्तात्रय खोटे, माऊली भोसले, राजू भोसले, समाजसेवक समीर शेख व गावातील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२.३० ते १ वाजता श्रींची सवाद्य मंदिर प्रदक्षिणा व शोभेची आतिषबाजी यांचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याची सांगता दुपारी १:३० वाजता महाप्रसादाने झाली. महाप्रसादासाठी दादाराव सोनाजी खोटे, बिभीषण साहेबराव गवारे, मारुती त्रिंबक भोसले यांचे विशिष्ट योगदान राहिले.

भजनी मंडळ, गायक, मृदंगाचार्य, कावडी फराळ पंगत, शोभेची दारू, मंडप - लाईट डेकोरेशन, पिण्याचे पाणी, फुलांची सजावट, छायांकन आदी विविध सेवेसाठी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. तसेच उदार देणगीदारांनी दिलेल्या अर्पणामुळे सोहळ्याला अधिक भर पडली. समस्त श्री भैरवनाथ भक्त, सांगवी (पा.) आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या पुढाकारातून हा सोहळा यंदाही भक्तिमय वातावरणात, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पार पडत आहे. भक्तांच्या वाढत्या सहभागामुळे सांगवीतील भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा हा परिसरातील एक महत्त्वाचा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जात आहे.

# जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

सलग तेरा वर्षापासून मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांचा उपक्रम समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत मधुमेहाची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी सतराशे रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले या उपक्रमाचे त्यांचे तेरावे वर्ष आहे शुक्रवारी अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, आय एम ए, एम्पा व योगेश्वरी डायबिटीस केअर सेंटर, प्रशांत नगर,अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महा शिबिर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे मुख्य




मार्गदर्शक डॉ. अतुल शिंदे यांनी मधुमेह होऊ नये यासाठी पंचसूत्री सांगितली त्यासोबतच मधुमेहाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी आहाराचे व व्यायामाचे महत्त्व नमूद केले तसेच भारतातील वाढलेला मधुमेह रोखण्यासाठी जनजागृती चे महत्व सांगितले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी,डॉ. राजेश इंगोले, डॉ. राहुल धाकडे, डॉ. उद्धव शिंदे, डॉ.सुलभा पाटील, डॉ. स्वाती शिंदे, प्रा.रोहिणी पाठक, मंजुषा जोशी उपस्थित होत्या.

सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वल करून धन्वंतरीचे पूजन करण्यात आले . यंदाचा डायबेटिक पेशंट ऑफ दि इयर पुरस्कार सुरेश मस्के यांना देऊन गौरविण्यात आले . याप्रसंगी डॉ नवनाथ घुगे, डॉ . राजेश इंगोले , डॉ .श्रीनिवास रेड्डी, डॉ सुलभा पाटील यांची भाषणे झाली. वैद्यकीय प्रतिनिधी निलेश सूर्यवंशी, अविनाश धायगुडे, उमेश देशमुख , रणजीत मंगे,विनोद स्वामी , अजित स्वामी ,माधवी सरवदे ,सारिका जाधव यांचाही सत्कार करण्यात आला .सुरुवातीला प्रा . रोहिणी पाठक यांनी प्रास्ताविक केले . पाहुण्यांचे स्वागत डॉ . स्वाती शिंदे यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकुमार निर्मळे यांनी केले . शेवटी मंजुषा जोशी यांनी सर्वांचे आभार मानले .

# यशस्वी होण्यासाठी जिद्द महत्त्वाची-रणवीर पंडित

**शिवाजीनगर बी. फार्मसी महाविद्यालयात फ्रेशर्स दिन आनंदात साजरा**

गेवराई ।प्रतिनिधी

कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे, मनात जिद्द ठेऊन वाटचाल केली तर यश आपल्याकडे येते, तेव्हा विद्यार्थ्यांनी जिद्द ठेऊन वाटचाल करावी व यशस्वी व्हावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. शिवाजीनगर गढी येथील कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर येथे विद्यार्थ्यांकरिता फ्रेशर्स दिन आयोजित करण्यात आला होता, यांवेळी ते बोलत होते.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर, शिवाजी नगर, गढी. येथे प्रथम वर्ष विद्यार्थ्याकरिता द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे उपसभापती श्रीराम पवार, शिवशारदा पब्लिक स्कूलचे प्राचार्य संतोष कुमार अन्नम. यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वर्तमान काळातील शिक्षण क्षेत्रात असलेल्या स्पर्धेचा



आणि त्याकरता आवश्यक असलेली जिद्द आत्मसात करून सामोरे जावे, तसेच आज दैनंदिन शिक्षणासह उत्तम आरोग्यासाठी खेळातही सहभाग आवश्यक आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. राख एम.एस., प्रा. बदरे ए.ए., प्रा.देशमुख आर.बी., प्रा.शेख एम.आय., प्रा.गोयकर एम.बी., प्रा.धुमाळ एम.डी., प्रा.देशमुख एस.व्ही, प्रा.गायकवाड व्ही.एस., प्रा.गायकवाड वाय.एम. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी पवार एस.जी., मोटे जी.आर., शिंदे आर.आर., शिंदे आर.आर., नाटकर आर.ई.,माने वाय.डी., काळे ए.एस., पवार पी.आर., शिंदे पी.बी., मडिकर ओ.एस. यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संवाद मेळाव्यानिमित्त ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत करतांना ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे नवनाथ लोंढे - अध्यक्ष, गोवर्धन सायंबर - सचिव, संघटनेचे पदाधिकारी - त्रिंबक मुळीक, आबासाहेब खिलारे, दत्ता घोडके, बाळू पालवे, काकासाहेब आगाशे, अनारसे, मनोहर जाधव, रामेश्वर भवर, बलभीम परकाळे, बाळू थोरवे, श्रीम. अनिता कवडे, श्रीम. उज्वला थोरे मॅडम, श्रीम. गायकवाड मॅडम दिसत आहेत.

# बालकांच्या स्वप्नांना पंख द्या ; ते देशाचे भविष्य आहेत. - इंजि.अभिजीत मुजमुले

जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश स्कूलमध्ये बाल दिन उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ ज्ञान मंदिर प्री. प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये बालदिन उत्साहात, आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो.त्यानिमित्त विद्यार्थ्यांनी केक कापून बालदिन साजरा केला.


कार्यक्रमासाठी सांगली जिल्ह्यात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेले इंजि.अभिजीत मुजमुले हे प्रमुख पाहुणे म्हणून होते.त्यांनी बालक हे आपल्या राष्ट्राचे भविष्य आहेत.त्यांची स्वप्ने जपणे,त्यांना संस्कारी वातावरण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे तर शिक्षकांनी,पालकांनी बालकांच्या स्वप्नांना पंख द्या ते राष्ट्राचे भविष्य असल्याचे बोलताना सांगितले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, शिक्षिका निवेदिता मुजमुले,प्रतीक्षा गुजर उपस्थित हे होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना स्वादिष्ट खाद्यपदार्थ,चॉकलेट व भेटवस्तू वाटप करण्यात आले.दिवसभर शाळेत आनंदी,उत्साही आणि रंगतदार वातावरण पाहायला मिळाले.



# केज शहरात रिफ्लेक्टर शिवाय धावणाऱ्या उसाच्या गाड्यांनी वाढवला अपघातांचा धोका; केजकरांची सुरक्षा धोक्यात

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील गंगा माऊलीशुगर उमरी आणि येडेश्वरी साखर कारखाना आनंदगाव या दोन साखर कारखान्यांचा ऊस वाहतूक करणारी वाहने सध्या केज शहरातून मोठ्या प्रमाणावर धावू लागली आहेत.या वाहनांवर आवश्यक रिफ्लेक्टर व मागील प्रकाशयंत्र (लाईट) नसल्याने रात्रीच्या वेळी या वाहनांचा अंदाज न आल्यामुळे अपघात होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे,केज शहरातून दोन राज्य महामार्ग जात असल्याने दिवसरात्र वाहनांची मोठी वर्दळ असते.अशा परिस्थितीत साखर कारखान्यांच्या ट्रॅक्टर - ट्रॉली आणि ट्रक यांच्या बेपर्वा वाहतुकीमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.मागील वर्षी अशाच उसाच्या वाहनांच्या धडकेत अनेक अपघात झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. काही ठिकाणी तर गंभीर जखमी आणि मृत्यूंच्याही घटना नोंदल्या गेल्या आहेत.मात्र,त्यानंतरही संबंधित साखर कारखान्यांनी आणि वाहतूकदारांनी यासंदर्भात कोणतीही ठोस खबरदारी घेतलेली नाही,अशी नागरिकांची तक्रार आहे.



अनेक नागरिकांनी सांगितले की,रात्रीच्या वेळी ऊस घेऊनजाणाऱ्या ट्रॉलींना रेफ्लेक्टर दिसत नाहीत,काही वाहनांच्या मागील दिवे बंद असतात. त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना ती वाहने नजरेस पडत नाहीत आणि अपघात घडण्याची शक्यता वाढते.तसेच ट्रॅक्टर चालकांनी लावलेल्या मोठ्या आवाजात गाणी वाजवत असल्याबाबत ही कारवाई होणे गरजेचे आहे.या बाबत नागरिकांनी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनाकडे आणि वाहतूक विभागाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. अपघात टाळण्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांवर रिफ्लेक्टर, मागील दिवे आणि ओव्हर लोड नियंत्रण यांची सक्ती करावी,तसेच गाणीमोठ्या आवाजात लावण्यावर पायबंद घालावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.केज तालुक्या तील या परिस्थितीकडे संबंधित विभागांनी लक्ष देऊन नागरिकांचा जीव धोक्यात न आणता सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण करावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जालना जिल्ह्यातील जय वीरु च्या जोडीत कुर्बानी कोणाची घेतली जाईल हे येणाऱ्या काळात कळेलच - मा ना अंबादासजी दानवे

बदनापुर-(प्रतिनिधी)आगामी जालना जिल्ह्यातील नगर परिषद व जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीच्या अनुषंगाने मा आमदार संतोष सांबरे यांनी पुढाकार घेवून शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दिनांक १३/११/२०२५ रोजी श्रीकृष्णरुक्मिणीनगर जालना येथे जिल्हा पदाधिकारी कार्यकारिणी आढावा बैठक मा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हा प्रमुख भास्कर अंबेकर यांच्या शिंदे गटात पक्ष प्रवेश झाल्यानंतर तातडीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनोद घोसाळकर व मा विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी मा आमदार संतोष सांबरे यांच्या सोबत सविस्तर चर्चा करून शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी बैठक आयोजित करण्याचे ठरले यावेळी माजी आमदार संतोष सांबरे यांच्या सह जिल्हाप्रमुख महेश नळगे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, मुरलीधर शेजुळ, भगवान कदम, मनीष श्रीवास्तव, उत्तमराव वानखेडे, तालुकाप्रमुख जयप्रकाश चव्हाण, दिनेश काकडे, कैलास पुंगळे, कुंडलिक मुट्ठे, पी एन यादव, अशोक बरडे, भरत सांबरे, युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश काळे, दिपक रणनवरे, संदीप झारखंडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीच्या अनुषंगाने गटनिहाय व नगर परिषद वार्डनिहाय आढावा देखील घेण्यात आली.

बैठक सुरू असताना शिवसेना पक्षप्रमुख मा उद्धव ठाकरे यांनी मोबाईल द्वारे शिवसैनिकांशी संवाद साधून एकसंघ राहून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व महानगर पालिका निवडणुकीत शिवसेना पक्षाला घवघवीत यश मिळण्यासाठी सज्ज राहावे व निष्ठेने पक्षाचे कार्य करत राहावे असे आवाहन केले,



यावेळी बोलताना मा. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, आगामी होऊ घातलेल्या जालना जिल्हा परिषद निवडणूकी साठी आपण गावा गावात जाऊन पक्ष संघटना बांधणी करावी. प्रत्येक गाव तांड्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शाखा स्थापन करून शिवसेना पक्ष मजबूत करणे हेच आगामी काळात निवडणूक जिंकन्यासाठीचे प्रभावी माध्यम आहे. इच्छुक उमेदवारानी आपल्या वार्डात गटात , गणात जाऊन शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांचे विचार जनमानसात न्यावे, फडणवीस, शिंदे, अजित पवार सरकारच्या विरोधात जनमानसात प्रचंड रोष असून आपण जनमानसापर्यंत पोहचुन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ध्येयधोरणानुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद डोळ्यासमोर ठेऊन काम केल्यास आगामी नगर परिषद जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत मोठे मताधिक्य घेऊन विजयी होऊ शकतो. आपण सर्वांनी शिवसेना पक्षाच्या उमेदवाराकरिता जोमाने कामाला लागा , भाजप प्रणित सरकारने फसव्या योजनांचे आमिष दाखवून सर्वसामान्य शेतकऱ्यांना फसविले असून आगामी निवडणूकित भाजप आणि त्यांच्या सहकारी मित्र पक्षाला धडा शिकवण्याची गरज आहे, त्यामुळे होऊ घातलेल्या निवडणूकित शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मशाल चिन्ह घराघरात नेऊन शिवसेनेचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी कसे होतील यासाठी जोमाने कामाला लागावे असे आवाहनही विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले. भास्कर अंबेकर यांच्या शिंदे गटात पक्ष प्रवेश संदर्भात बोलतांना त्यांनी शोले चित्रपटाचे उदाहरण दिले व जालना जिल्ह्यातील जय वीरू च्या जोडीत बसंती कोणाला मिळेल आणि कुर्बानी कोण देईल हे येणाऱ्या काळात लवकरच कळेल, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच सांगितले की भास्करराव मागील अनेक महिन्यांपासून आमच्याच पक्षाचे काम करत होते त्यामुळे सर्व गोष्टी उघड झालेल्या आहे असे ही अंबादास दानवे यांनी या वेळी सांगितले यावेळी बोलताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की, काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जालन्यात काही जणांनी शिंदे गटात प्रवेश केले असून यामुळे जिल्ह्यात शिवसेनेचे नुकसान झाल्याचे बोलले जाते परंतु आतापर्यंत शिवसेना पक्षावर अनेक आघात झाले, छगन भुजबळ, नारायण राणे, राज ठाकरे, एकनाथ शिंदे हे पक्ष सोडून गेले परंतु पक्षाने नवीन नेतृत्वाला संधी देऊन नव्या जोमाने भरारी घेत संकटावर मात केली. दुसऱ्याच्या घरी घरकाम करणारी महिला राज्याची मंत्री केली. पानटपरी चालवणारा, रिक्षाचालक, असे अनेक सर्वसामान्य लोकांना मा. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मोठे केले. परंतु ते पक्षासोबत एकनिष्ठ राहिले नाही. एकनाथ शिंदे यांनी आपला पक्ष व चिन्ह जरी चोरले असले तरी जनमानसात मा. उद्धवजी ठाकरे यांच्याप्रती असलेली प्रतिमा व जनमानसाची लोकभावना ते बिघडवु शकले नाही. जनभावना आपल्या पक्षासाठी अत्यंत प्रतिकूल असून आपण सर्वांनी मिळून स्व. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घराघरात नेऊन पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. शिवसेना भविष्यात फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेतल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार संतोष सांबरे यांनी केले.या प्रसंगी महेश नळगे,भानुदास घुगे,रमेश गव्हाड,मुरली आप्पा शेजुळ,यांनी आपल्या भाषणात पक्ष संघठना बळकट करणे व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भगवा फडकविण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन केले,या कार्यक्रमात जालना जिल्ह्यातील शिवसैनिक व पदाधिकारी यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती व अत्यंत जोशात आणि उत्सुरफूर्त पणे शिवसैनिक घोषणाबाजी करत होते



महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे साहेब हे आष्टी तालुका नियोजित दौरा निमित्त आले असता त्यांचे हेलिपॅडवर स्वागत – सत्कार करताना दत्ताभाऊ बोडखे, समवेत विधिज्ञ सतीश शिंदे, सरपंच सुधीर पठाडे, गणेश मोहळकर, गोवर्धनजी शेलार आदी मान्यवर दिसत आहेत.

## वडील रागावल्याने रूसून गेलेला तरूण ३५ वर्षांनी परतला अचानक घरी कुटुंबासह गावात आश्चर्याचा सुखद धक्का....!

पैठण /प्रतिनिधी

पैठण तालुक्याच्या नांदर येथील घटना अनिस आजिम अत्तार वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी वडील रागावल्याने रूसून गेलेला तरूण आपल्या भुमीत परतला, इतक्या कमी वयात गेलेले अनिस आतार हे सद्ध्या सौदी अरेबिया येथील एका नामांकित कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहेत, अशा प्रकारे स्वतःच्या पायावर उभे राहीलेले हे अजब गजब उदाहरण क्वचितच बघायला मिळते, विषेश म्हणजे इतक्या कमी वयात घर सोडून गेल्यावर देखील अनिस यांनी कुठल्याही प्रकारचे टोकाचं पाऊल न उचलता संसार देखील उभा केला आहे, त्यांना दोन मुले एक मुलगी असा परिवार आहे,

आणि त्यांना विचारले असता त्यांनी गावी येण्याचा निर्णय का घेतला त्यांनंतर त्यांनी सांगितले की माझ्या मुलीच्या हट्टापायी मला यावेच लागले नसता तिन माझ्याशी बोलण्याच बंद करेल अशी एकप्रकारे धमकीच मला घातली म्हणून मी घरी येण्याचा निर्णय घेतला.घरी आल्यानंतर काय वाटतं विचारल्यावर त्यांना अश्रुंच्या धारा आवरत नव्हत्या घरचे देखील मायेने अश्रू अनावर



झाले होते,

यावेळी गावातील नागरिकांनी देखील त्यांना बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती, यावेळी हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन देखील येथे घडून आले गावातील हिंदू बांधवांनी देखील अनिस यांचा सत्कार करण्यात आला, गावकरी यांनी आदरसत्कार केल्यानंतर अनिस यांच्यासह उपस्थित देखील भावनिक अश्रू आवरू शकले नाही

अनिस आत्तार यांच्या या पुनर्भेटीने गावात जुन्या आठवणी जाग्या झाल्या असून, त्यांच्या कहाणीने ओढ लावती जिवा गावाकडची माती हे अशाप्रकारे देखील बघायला मिळाले आहे यावेळी उपस्थित शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय पाटील सदावर्ते, शुभम भैय्या गायकवाड, संदीप आण्णा सोनवणे, नय्युम आत्तार, मोसीन आत्तार, योगेश वैद्य, फारुख शेख, गणेश तळपे, रोहीत तावरे, दत्ता गायके, आकाश सुरळे अनिल सोनवणे,प्रकाश सोनवणे, ऋषिकेश काळे, व गावातील नागरिक व उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते

## आरदखेडा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला शालेय साहित्य भेट

जाफराबाद /हरी भालके

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा आरदखेडा येथे शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा पतसंस्थेचे विद्यमान संचालक श्री.संजय निकम यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच शासकीय सेवेला ३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आरदखेडा येथील जिल्हा परिषद शाळेला ४३ इंच स्मार्ट एलईडी टीव्ही भेट दिला आहे. त्याचबरोबर टेंभुर्णी येथील मयुरी कृषी सेवा केंद्राचे मालक श्री ज्ञानेश्वर पा अंधारे यांनी शाळेला ५० लेझीम व वृक्ष संवर्धनासाठी ठिबक सिंचनचे साहित्य तसेच टेंभुर्णी येथील प्रसिद्ध व्यावसायिक ज्ञानेश्वर फिरके यांनी कवायती साठी ५० डंबेल्स भेट म्हणून शाळेला दिले आहे.यावेळी



शाळेचे मुख्याध्यापक श्री विनोद घोडेस्वार यांनी संजय निकम व ज्ञानेश्वर अंधारे यांचा यथोचित सन्मान केला. कार्यक्रमासाठी शिक्षण प्रेमी नागरिक दीपक डोळे, शरद पवार,संजय पवार,समाधान दांडगे, संदिप दांडगे,अंगणवाडीच्या उषा भांबळे, जया भिसे,नंदा शिंदे, मनीषा राऊत,शीला चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सावता तिडके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री विनोद घोडेस्वार,श्री मधुकर उखर्डे,श्रीमती सुनिता खलसे ,श्री संदीप जाधव यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

## बालदिनाचे औचित्य साधून शाळेच्या प्रांगणात भरवला 'बाल आनंद मेळावा'

एकलव्य विद्यालयात बालकांनी अनुभवली खरी कमाई

मानूर ।प्रतिनिधी

बालदिनानिमित्त एकलव्य विद्यालय, शिरूर कासार येथे शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी 'बाल आनंद मेळावा' उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला उत्साहवर्धक वातावरण लाभले.

मेळाव्याची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. विद्यार्थ्यांनी बालदिनाचे महत्त्व सांगत आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवचरित्रकार कैलास तुपे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यानंतर शाळेच्या प्रांगणात 'बाल आनंद मेळावा' सुरू झाला.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतः



विविध वस्तू बनवून त्यांची विक्री करण्याचा अनुभव घेतला. जणू हा बालबाजारच असून व्यावहारिक ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली. मुलांनी तयार केलेल्या वस्तूंची पालकांनी उत्साहाने खरेदी करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.

एकलव्य विद्यालयात वर्षभर अनेक उपक्रम राबवले जातात. त्याच परंपरेचा भाग म्हणून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि व्यावहारिकतेकडे कल वाढावा या उद्देशाने 'बाल आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला.

मेळाव्यात भेळ, पाणीपुरी, अप्पे, कचोरी, भेलपुरी, रगडा, गुलाबजाम, भजी, वडापाव, मसाला पापड, इडली-सांबार, दाल-रोटी यांसह पेरू, बोरं अशा चविष्ट पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी स्वतः चालवले. मुलांनी बनवलेल्या पदार्थांची चव पालकांनी आणि पाहुण्यांनी चाखून कौतुक केले. विक्रीतून झालेल्या कमाईचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.बालदिनानिमित्त मुलांचे व्यक्तिमत्त्व विकास, आनंद, आत्मविश्वास आणि शिकण्याची आवड वाढविणे हा उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे प्राचार्य निलेश पोकळे यांनी सांगितले.मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा बाल आनंद मेळावा अविस्मरणीय केला.

## ग्रामीण पर्यटनाला नवी दिशा देणाऱ्या मातोश्री पर्यटन केंद्रा चा तिसरा वर्धापनदिन जल्लोषात

### पत्रकार संरक्षण समितीकडून मालक गोवर्धन उगले पाटील यांचा सत्कार

अंबड /प्रतिनिधी

जालना-अंबड मार्गावरील लालवाडी परिसरातील हिरवळ, निसर्गसंपन्न वातावरणात उभारलेले मातोश्री पर्यटन केंद्र हे अल्पावधीतच पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. आपल्या तिसऱ्या वर्धापनदिनाच्या औचित्याने येथे खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने अंबड तालुका पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने पर्यटन केंद्राचे मालक गोवर्धन उगले पाटील यांचा शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

गेल्या तीन वर्षांत मातोश्री पर्यटन केंद्राने ग्रामीण पर्यटनाला दिलेली गती उल्लेखनीय आहे. परिसरातील शांतता, नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यटकाभिमुख सुविधा यामुळे हे केंद्र कुटुंबांसाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आदर्शस्थळ ठरत आहे. केवळ पर्यटन सुविधा नव्हे तर गावातील युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून उगले पाटील यांनी ग्रामीण विकासालाही हातभार लावला आहे.सत्कार करताना पत्रकार संरक्षण समितीचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर सोळूंके म्हणाले

ग्रामीण पर्यटनाला चालना देणे स्थानिक रोजगारनिर्मिती करणे आणि परिसराच्या प्रगतीस गती देणे ही गोवर्धन उगले पाटील यांची कामगिरी सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे ही पत्रकारांची सामाजिक जबाबदारी आहे.या कार्यक्रमाला समितीचे वरिष्ठ सदस्य संजय उपाध्ये, गणेश सपकाळ, गजानन पुरी, राजेंद्र गायकवाड, मतिन शेख, राजेंद्र मोताळे यांसह अनेक




पत्रकार आणि मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी एकमताने व्यक्त केले की ग्रामीण भागात सकारात्मक कार्य करणाऱ्यांचा सत्कार केल्यास त्यातून समाजात नवी ऊर्जा निर्माण होते.सत्कार स्वीकारताना गोवर्धन उगले पाटील म्हणाले

मातोश्री पर्यटन हे केवळ केंद्र नसून आमच्या गावाचा अभिमान आहे. पुढील काळात नव्या संकल्पना आणून पर्यटकांना अधिक उत्तम अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

कार्यक्रमानंतर पाहुण्यांनी पर्यटन केंद्राची पाहणी करून परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, बांधकामाची आकर्षक रचना आणि उपलब्ध सुविधांचे कौतुक केले. दिवसभर वर्धापनदिनाचा उत्साह पाहायला मिळत होता.

अशा सकारात्मक आणि विकासाभिमुख उपक्रमांमुळे ग्रामीण पर्यटनवाढ रोजगारनिर्मिती आणि विकासाला नवी दिशा मिळत असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



## रस्त्याची दुराअवस्था जागोजागी मोठे खड्डे– नागरिकांचा संताप

प्रतिनिधी – हरी भालके

जाफराबाद : जाफराबाद ते चिखली विदर्भ मराठवाडा मार्गावरील रस्त्याची परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यापासूनच सुरू झालेली ही समस्या अद्याप कायम आहे. या रस्त्याचा उपयोग स्थानिक नागरिकांसोबत भाविक, पर्यटक तसेच आपत्कालीन सेवेच्या वाहनांसाठी देखील मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र रस्त्याची दुरावस्था पाहता.

सध्या ऊस तोडणी चालू असल्या मुळे या रस्त्यावर ट्रॅक्टर,ट्रक यांना जीव मुठीत कसरत करावी लागत आहे.

ॲम्ब्युलन्स, शाळेची वाहने आणि ऊस वाहतूक वाहन खासगी बस वाहतूक अडचणीत येत आहे. या जागोजागी खड्डे असल्या मुळे अनेक दोन चाकी वाहन धारकांना जीव गमवायला लागला आहे. स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या, पत्रव्यवहारही करण्यात आला, परंतु अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही. रात्री च्या वेळस तर खूप लोक खड्डा चुकवतांना पडतात अशी चर्चा होत आहे.त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी पसरली आहे. श्री क्षेत्र राजुर व श्री क्षेत्र शेवगाव पर्यटनस्थळ जाणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित दखल घ्यावी, तथा प्रशासनाने लक्ष देऊन रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# आ.सुरेश धस यांची बारगजे दांपत्याची निवासस्थानी सदिच्छा भेट : सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे कौतुक



पाटोदा ।प्रतिनिधी

इन्फंट इंडिया आनंदग्रामचे संस्थापक संध्याताई आणि दत्ता बारगजे या दांपत्याने नुकतीच आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत मनमोकळा संवाद साधला. एचआयव्ही बाधित अनाथ, वंचित, उपेक्षित आणि निराधार बालकांच्या पुनर्वसनासाठी गेल्या अनेक वर्षांपासून हे दांपत्य जे अद्वितीय आणि निस्वार्थी कार्य करत आहे, त्याबद्दल आ.धस यांनी यावेळी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त आली.ज्या बालकांना जन्मदात्या नात्यातील लोकांनीही स्वीकारले नाही, अशा निराधार मुलांना स्वतःच्या लेकरांप्रमाणे मायेचा हात, संस्कार आणि सुरक्षित आयुष्य देण्याचे महान कार्य बारगजे दांपत्य सातत्याने पार पाडत आहे. मानवतेचा सर्वोच्च आदर्श मांडणारे हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून 'अनाथांचे नाथ' म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ होत आहे.

या सदिच्छा भेटीदरम्यान बारगजे दांपत्याचे हार्दिक स्वागत करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीस दाद देण्यात आली. मुलांच्या संगोपन, पालनपोषण, आरोग्य आणि शिक्षणाच्या दिशेने ते करत असलेल्या कामाचा आढावा घेत संवाद साधण्यात आला. या उदात्त सेवाभावाबद्दल आ.सुरेश धस यांनी शुभेच्छा देत भविष्यातही हे कार्य अधिक व्यापक व्हावे, अशी सदिच्छा व्यक्त केली

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती साजरी



केज/प्रतिनिधी

दि.११ नोव्हेंबर २०२५ मंगळवार रोजी मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले व जयंती साजरी करण्यात आली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म दि. ११ नोव्हेंबर १८८८ रोजी मक्का येथे झाला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रमुख नेते आणि पहिले शिक्षणमंत्री होते.अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद असे त्यांचे मुळ नाव होते.हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केलाजातो. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती.आझाद हे टोपण नावही त्यांना उपाधी मिळाली.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे यांनी केले.या शाळेतील प्राथमिक पदवीधरशिक्षक डॉ.रामकिशन मुळे सर यांनी सविस्तर माहिती दिली.शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ.मुळे रामकिशन,श्री संदीप ठोंबरे,श्री राहुल बचुटे,श्री.आबासाहेब धपाटे,श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम,श्रीमती उटीकर अंजली गोविंद मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी काळे, शापोआ कामगार सुवर्णमाला नानासाहेब पवार,विद्यार्थी,विद्यार्थिंनी उपस्थित होते.शेवटी राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले.

# राजकिशोर मोदी यांनी प्रभाग १ व प्रभाग २ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेत प्रचाराचा केला श्रीगणेशा



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून त्यामध्ये दिवसेंदिवस निवडणूकित रंग भरत असल्याचे दिसून येऊ लागले आहे. याच अंबाजोगाई नगर परिषदेच्या रणधुमाळीत नगराध्यक्ष पदाचे प्रमुख उमेदवार राजकिशोर मोदी यांनी त्या त्या प्रभागातील आपल्या सहकारी उमेदवारांना घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. गुरुवार दि १३ रोजी प्रभाग क्रमांक १ मधून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत प्रचाराचा शुभारंभ केला. शुक्रवार दि १४ रोजी प्रभाग क्रमांक २ मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याची व मतदान रुपी आशिर्वाद देण्याची साद राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी दिली. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १ मधील प्रमुख उमेदवार संकेत राजकिशोर मोदी व हाजी शेख व त्या प्रभागातील अनेक सहकारी उपस्थित होते. तर प्रभाग क्रमांक २ मध्ये तेथील प्रमुख उमेदवार अंकुश हेडे व मणियार व त्या प्रभागातील प्रमुख सहकारी हे सहभागी होते.

प्रभागातील या भेटीदरम्यान राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतदारांच्या कडून उत्स्फूर्तपणे स्वागत केल्या जात होते. त्याचबरोबर जागोजागी सुवासिनींकडून औक्षण देखील केल्या जात होते. यावरून राजकिशोर मोदी यांच्या प्रति मतदारांचा विश्वास व प्रेम दिसून येत होते. अंबाजोगाई शहर हे मोदी कुटुंबाला मानणारे शहर आहे. त्याच्याच सहकार्य व आशीर्वादाने राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहर वासीयांची सेवा करत आहेत. आपल्या पित्याच्या समाजसेवेचा राजकीय वसा पुढे चालवण्यासाठी त्यांचे सुपुत्र संकेत मोदी हे त्यांच्या आयुष्यातील पहिलीच निवडणूक लढवीत आहेत. संकेत मोदी हे शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत आपला सक्रिय सहभाग घेऊन त्यातून त्यांनी युवकांची एक नवीन फळी तयार केली आहे. संकेत मोदी यांनी गणेशोत्सव काळात अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाच्या ढोलताशा वाद्य स्पर्धा घेऊन अंबाजोगाई चे ढोल पथक साऱ्या महाराष्ट्र भर पोचवले आहे. त्याचबरोबर नवरात्र उत्सवात दांडिया स्पर्धेची उत्कृष्ट अशी स्पर्धा आयोजित करून येथील महिला, युवक व युवतींना एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून संकेत मोदी हे अंबाजोगाई शहरातील घराघरात पोचले आहेत.

अंबाजोगाई नगर परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी हे त्यांनी आजपर्यंत केलेल्या विकासकामांच्या बळावरच यापुढेही मतदान रुपी आशिर्वाद मागत आहेत. अंबाजोगाई शहर हे एक कुटुंब म्हणून आपण काम केले असून येथील नागरिकांनी देखील भक्कम अशी साथ दिली आहे. यापुढेही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना पाठबळ देण्याचे आवाहन या प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी मतदारांना करत आहेत. मतदार देखील खंबीरपणे मोदी कुटुंबाच्या पाठीशी राहण्याचे अभिवचन देताना दिसून येत आहेत. शहरातील मतदार नवयुवक, महिला व जेष्ठ नागरिक यांच्या कडून मिळत असलेले प्रेम पाहून मोदी व त्यांचे सहकारी भारावून जात आहेत व त्यांच्यात पुन्हा जोमाने काम करण्याची ऊर्जा संचारत असल्याची भावना निर्माण होत आहे.

# अरुणाचल प्रदेशात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत संजीवनी काचेवाडची धडाकेबाज एन्ट्री



धनुष आर्चरी अकॅडमीची आणखी एक चमकदार कामगिरी

जालना /प्रतिनिधी

अरुणाचल प्रदेश येथे २५ ते २७ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या ४२ व्या सब-ज्युनियर नेशनल टूर्नामेंटसाठी जालना जिल्ह्यातील संजीवनी काचेवाड हिची भक्कम निवड झाली आहे. स्थानिक गावी आणि क्रीडा क्षेत्रात तिच्या या निवडीने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.संजीवनीच्या या उल्लेखनीय यशामागे धनुष आर्चरी अकॅडमीचे प्रशिक्षक सचिन रमेश टेकुर आणि शुभम शिंदे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.सातत्यपूर्ण सराव आणि लक्ष्याभिमुख मेहनतीच्या जोरावर संजीवनीने नेशनल स्तरावर आपले स्थान पक्के केले आहे.या यशाबद्दल महाराष्ट्र कुस्तीगिरी परिषदेचे राज्यउपाध्यक्ष प्रा.दयानंद भक्त तसेच डॉ.श्याम काबुलीवाले यांनी संजीवनीचे मनापासून अभिनंदन केले.पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांनी तिच्यात राष्ट्रीय पातळीवर विजेतेपद पटकावण्याची क्षमता असल्याचे सांगितले.

संजीवनीच्या निवडीने परिसरात आनंदाचा माहोल असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनांचा वर्षाव होत आहे.तिच्या क्रीडा प्रगतीकडे आता सर्वांच्याच आशेने नजरा लागल्या आहेत.

# आमदार सुरेश धस यांच्या सुचनेनुसार जि.प., पं. स. साठी भाजपने मागवले इच्छुकांचे अर्ज

प्रतिनिधी ।पाटोदा

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, डोंगरकिनी, पारगाव घुमार या तिन जिल्हा परिषद गट व डोंगरकिनी, दासखेड, सौताडा, अंमळनेर, पारगाव आणि पीट्टी या सहा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुकांची गर्दी जमली आहे. इच्छुकांची उमेदवारीसाठी धावपळ सुरु असुन भारतीय जनता पक्षाकडून आमदार सुरेश धस यांच्या सुचनेनंतर सक्षम उमेदवाराच्या निवडीसाठी इच्छुकांचे अर्ज स्विकारण्यास सुरुवात केली आहे. अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष भागवत येवले यांनी दिली आहे.

तिन जिल्हा परिषद गटांसह सहाही पंचायत समिती गणांमध्ये भाजपाला विजय मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वात भाजपाने मोर्चेबांधणी केली आहे. त्याच प्रमाणे बीड जिल्ह्यातील इतर गट व गणांचीही जबाबदारी निवडणूक प्रमुख म्हणून आमदार सुरेश धस यांच्यावर आहे. त्या दृष्टीने निवडणूकीच्या दृष्टीने उमेदवार निवडीच्या प्रक्रियेवर आमदार घस

जनतेचे निवडणुकीच्या दृष्टीने राजकीय घडामोडींकडे लक्ष

माजी आमदार बाळासाहेब आजबे व नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दाखल झालेले माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या राजकीय टायमिंगकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून मात्र उमेदवारी संदर्भात फारशी हालचाल झाल्याचे दिसुन येत नाही. दरम्यान आमदार धस यांनी स्थानिक पातळीवर लक्ष केंद्रीत केले असून निवडणूकीच्या दृष्टीने पक्षसंघटन मजबुतीवर भर दिला आहे. येत्या काळात कोणत्या राजकीय घडामोडी घडतील याकडेही नागरीकांचे लक्ष लागले आहे.

यांचे बारकाईने लक्ष देत आहेत. इच्छुकांची संख्या मोठी असल्याने पक्षांतर्गत समतोल राखून योग्य उमेदवाराची निवड करण्याचे आव्हान भाजपासमोर असणार आहे. इच्छूकांनी येत्या दोन दिवसात सर्व कागदपत्रांसह उमेदवारी अर्ज दाखल करावेत. असे आवाहन तालुकाध्यक्ष भागवत येवले यांनी केले आहे. यावेळी तालुका पदाधिकारी उपस्थित होते.



पाटोदा/प्रतिनिधी

जन्ममृत्यू नोंदणीतील विलंब आदेशाची प्रक्रिया न्यायालयाकडून महसूल विभागाकडे गेल्यापासून नागरिकांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. तहसील कार्यालयांत तांत्रिक मनुष्यबळाचा पूर्ण अभाव, कायदेशीर प्रशिक्षण नसलेले कर्मचारी आणि आधीच प्रचंड कामाचा बोजा-या सगळ्या कारणांमुळे प्रकरणे महिनोन्महिने रखडत आहेत. त्यामुळे जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांसारख्या मूलभूत दस्तऐवजांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाचे खेटे मारावे लागत आहेत त्यामुळे नागरिकांची प्रचंड अडवणूक होत संदर्भातीलतील अडवणूक थांबवून ही प्रक्रिया सुलभ करावी अशी मागणी पाटोदा वकील संघाच्या वतीने शुक्रवार रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली

निवेदन देताना पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी.आर. लवुळ, उपाध्यक्ष ॲड. जब्बार पठाण, सचिव एडवोकेट विलास पवार कोषाध्यक्ष ॲड. विशाल मस्के, ॲड. जगदाळे, ॲड. सचिन जावळे, ॲड. अमरीश वैद्य, चंदन कांकरिया, ॲड. महेश बेदरे, ॲड. पुनम शहाणे, ॲड. एस.बी. थोरवे, ॲड. तळेकर, ॲड. तुषार जाधव आदी सदस्य उपस्थित होते.



# शिरूरघाट येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांचा पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिरूरघाट येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात पंकजाताई मुंडे यांनी सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना भाजपच्या ध्येयधोरणासाठी सक्रियपणे कार्य करण्याचे आवाहन केले.

नव्या कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश करून आगामी काळात भाजपचे विकासकार्य आणि विचारधारा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रवेशामुळे स्थानिक स्तरावर पक्षाला संघटनात्मक बळकटी मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या पक्षप्रवेश सोहळ्यात शिरूरघाट ता. केज येथील माजी सरपंच सुंदर हजारे, अशोक गायकवाड, नवनाथ धेंडूळे, रवींद्र विडेकर, आश्रुबा घोडके, मारुती लोंढे, दिनकर केकाण, विकास भवलकर आणि रामेश्वर हजारे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमाला संतोष हांगे, भगवान केदार, विष्णू घुले, डॉ. वासुदेव नेहरकर यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रवेशामुळे शिरूरघाट परिसरात भाजपचे राजकीय बळ अधिक वाढले असून, आगामी निवडणुकीत त्याचा थेट परिणाम स्थानिक राजकारणावर दिसेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला.

# ट्रॅव्हल्स गाड्यांमुळे वाहतूक कोंडीचा अड्डा बनले बसस्थानक परिसर

## परळी पोलिसांनी तातडीने कारवाई करावी - ॲड. मनोज संकाये

रात्रीच्या वेळी ट्रॅव्हल्स गाड्यांमुळे नागरिकांना त्रास, अपघाताचा धोका वाढला



परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्यावर रात्रीच्या वेळी ट्रॅव्हल्स गाड्या उभ्या राहत असल्याने वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे एसटी बस, रुग्णवाहिका आणि खासगी वाहनांची मोठी रांग लागते, तसेच नागरिकांना ये-जा करण्यासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागतो.या गंभीर परिस्थितीबाबत सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज संकाये यांनी परळी पोलिस प्रशासनाचे लक्ष वेधून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.दररोज रात्री बसस्थानकासमोर अनेक ट्रॅव्हल्स गाड्या उभ्या राहतात. प्रवाशांची गर्दी, अनियमित पार्किंग आणि वाहतुकीचा विस्कळीत प्रवाह यामुळे संपूर्ण परिसर अराजकतेच्या वातावरणात सापडतो. बस आगारातून सुटणाऱ्या एसटी बसलाही या गर्दीतून मार्ग काढणे कठीण होते.हा रस्ता परळी शहराचा मुख्य वाहतूक मार्ग असून, इथून रुग्णवाहिका व शालेय वाहनेही जातात. अशा ठिकाणी ट्रॅव्हल्स उभ्या राहणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे, असे मत ड. मनोज संकाये यांनी व्यक्त केले.त्यांनी पुढे सांगितले की, वाहतूक पोलिसांनी दररोज या ठिकाणी गस्त घालावी, चुकीचे पार्किंग करणाऱ्या ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई करावी. अन्यथा अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.सदर ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा त्रास वाढला असून, नागरिक वर्ग आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. स्थानिक सामाजिक संघटनांनी देखील प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर तातडीने कारवाई झाली नाही, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असेही ते म्हणाले.परळीकरांची अपेक्षा आहे की, परळी पोलिस प्रशासनाने तातडीने पावले उचलून बसस्थानक परिसरातून ट्रॅव्हल्स गाड्यांचे अतिक्रमण दूर करावे, वाहतूक सुरळीत करावी आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे.

# आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजला तृतीय पारितोषिक



प्रतिनिधी । बीड

श्री सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेली विभागीय सकाळ करंडक अंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा शनिवारी जल्लोषात संपन्न झाली. ७ व ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांमधून मिळून ८ संघ सहभागी झाले होते.

# कंधार नगरपालिकेचा कॉंग्रेस पक्षाचा नगराध्यक्ष एकच चेहरा का ?

## कॉंग्रेस पक्षामध्ये ज्येष्ठ नेत्यांना संधी नाही

कंधार /प्रतिनिधी

कंधार शहरात नगरपालिकाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेते मंडळी सक्रिय झाले असून अनेक उमेदवार निवडुक रिंगणात असल्याचे सांगले जात आहे. कॉंग्रेस पक्षाकडून नवीन चेहरा देण्यात यावा अशी मागणी जनतेमधून होत आहे . गेल्या अनेक वर्षापासून नगराध्यक्ष पद एकाच परिवारामध्ये का ?कॉंग्रेस पक्षामध्ये ज्येष्ठ नगरसेवक असून सुद्धा कॉंग्रेस पक्षाकडून भूमिका काय ?याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे.

कॉंग्रेस पक्षामध्ये चार चार टर्म नगरसेवक पदावर व उपनगराध्यक्ष पदावर असून सुद्धा त्यांना आजपर्यंत नगराध्यक्ष पदाची संधी दिली नाही आता संधी आली तर त्यांना कॉंग्रेस पक्ष नाकारत आहे. त्यासाठी नवीन चेहरा देण्यात यावा यासाठी सर्वसामान्य मध्ये चर्चा होत आहे.

कंधार शहर कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून बघितल्या जाते बालेकिल्ल्यांमध्ये कॉंग्रेस पक्षाचे मतदान सर्वात जास्त असून यावेळी नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी द्यावी एकाच परिवारातील पुन्हा पुन्हा तेच नगराध्यक्ष पद नको यासाठी सर्वसामान्य मध्ये चर्चा ना उधाण आले आहे ,कॉंग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना संधी देण्यात यावी पण पक्षाची भूमिका काय आहे.

विस विस वर्ष नगरसेवक पदावर असलेले व कॉंग्रेस पक्षामध्ये अनेक नगरसेवक उपनगराध्यक्ष असून लोकसभा .असो विधानसभा, जिल्हा परिषद ,पंचायत समिती आसो ,नगरपालिका निवडणुकीमध्ये महत्वाची भूमिका बजवणाऱ्या कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना व कार्यकर्त्यांना बाजूला करून व त्यांना डावळुन कॉंग्रेसच्या नेत्यांना विश्वासात न घेता नगराध्यक्ष पद घोषित करणारे हे कोण ? अशी ही चर्चा कॉंग्रेसच्या काही ज्येष्ठ नेत्याकडून होत आहेत , कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्ष व लातूरचे खासदार नांदेडचे खासदार यांनी कंधार नगरपालिकेची निवडणूकीला सुरुवात झाली आहे.कंधार शहरात आले नाही अशीही चर्चा होत आहे.

गेल्या पाच वर्षाखाली जनतेमधून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कॉंग्रेस पक्षाकडून नळगे तर आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचे विश्वासू जफरभाई रिंगणामध्ये होते ,त्यावेळी नगर उपाध्यक्ष पदासाठी कॉंग्रेसचे उमेदवार कसे विजयी होतील त्या उद्देशाने कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेत माजी उपनगराध्यक्ष मन्नानभाई चौधरी यांनी आपल्या प्रभागातून सर्वात जास्त मताची लीड पक्षाच्या नगराध्यक्षाला दिली कॉंग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष विजयी झाले, मन्नान भाई चौधरी यांची महत्त्वाची भूमिका कॉंग्रेसच्या उमेदवारांना विजय मिळवून दिला आज कॉंग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी मागता त्या कॉंग्रेसच्या महत्त्वाच्या मांडणाऱ्या नेते माजी उपनगराध्यक्ष मुन्नाभाई चौधरी यांना नगराध्यक्ष पदासाठी कॉंग्रेस पक्षाची उमेदवारी मिळणार का ?नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रभाग क्र २० मधून भाजपाचे ओबीसी पुरुष उमेदवार श्रीनिवास जाधव , वैजनाथ देशमुख, संतोष वर्मा , विनोद कांचनगीरे का अन्य कोण ? ओबीसी उमेदवारात मात्र मोठी चूरस असल्याचे दिसून येते



**नविन नांदेड दक्षिण मतदार संघातील सिडको हाडको प्रभाग क्र २० मध्ये एक जागा पुर्वी प्रमाणेच ओबीसी पुरुषा साठी तर एक जागा ओबीसी महिले साठी आरक्षित असून या प्रभागा मध्ये पुर्वी कॉंग्रेस चे नगरसेवक असलेले श्रीनिवास जाधव ओबीसी पुरुष तर ओबीसी महिले मधून मंगला देशमुख हे चालू सदस्य असून हे यापूर्वी कॉंग्रेस चे नगरसेवक होते**

तर आता हे सर्वजन सध्या माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेत्तुत्वात एकाच पक्षात असल्यामुळे निवडणुकी च्या वेळी पक्षाला मोठी डोके दुखी ठरणार आहे कारण या दोन जागेसाठी कोण असणार उमेदवार भाजपा पक्ष कोणचा विचार करणार कोण असणार उमेदवार व भाजपा पक्ष नेत्तृत्व कुणाला देणार उमेदवारी देऊन इतर इच्छुकांना करणार थंड का हे कुणी करणार बंड हेच पहावा येत्या निवडणुकीत पाहावा लागणार आहे .

कारण सध्या तरी सर्वजन इच्छुक उमेदवार असून निवडणुकी साठी सज्ज असल्याचे दाखवत आहेत मात्र येत्या काळात कळेल रिंगणात कोण आणि रिंगणा बाहेर कोण हेच पाहावा लागणार आहे कारण जनता जनार्दन येत्या काळात निवडणुकी च्या माध्यमातुन दाखवून देतील की कुणला संधी देतील आणि कुणाला घरचा रास्ता दाखवतील हेच चित्र निवडणुकी नंतर बघावा लागेल .

# पाचव्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी ऐक तर नगरसेवक पदासाठी सात उमेदवारी अर्ज दाखल

## भाजप पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दाखल

**कंधार प्रतिनिधी**

**कंधार नगरपालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी दि.१४ नोव्हेंबर रोजी ७ उमेदवारांनी नगरसेवक पदासाठी अर्ज भरले आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी ऐक उमेदवारी अर्ज आले असल्याचे माहिती दिली आहे .**

दि १३ रोजी गुरुवारी , नगरसेवक पदासाठी तीन उमेदवारांनी अर्ज केला होता, एकूण नगरसेवक पदासाठी १० असे तर नगराध्यक्ष पदासाठी एक उमेदवारांनी अर्ज आल्याची माहिती दिली आहे.कंधार नगरपालिका नगरसेवक पदासाठी अर्ज दि . १३ व १४ रोजी प्रभात क्रमांक १, अ, १ उमेदवार , ब, ३ , प्रभाग क्रमांक ४, जागा १ ,अ, क्रमांक १, ब , प्रभाग क्रमांक ६ जागा ,अ, १ प्रभाग क्रमांक ७ जागा,अ, १,ब, १

प्रभाग क्रमांक १० जागा ब, १ व नगराध्यक्ष पदासाठी एक जागा ,एकूण नगरसेवक पदासाठी १० अर्ज प्राप्त झाले आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी रामेश्वर गोरे यांनी दिली आहे.अर्ज भरण्याची प्रकिया सुरू झाली आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. १८ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. २१ नोंव्हेबर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. २६ नोव्हेंबरला निवडणुक चिन्हांचे वाटप होणार आहे. मतदान २ डिसेंबर रोजी, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी पार पडणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी प्रथम ऑनलाईन उमेदवारी अर्ज भरावा, त्यानंतर त्या अर्जांची प्रिंट काढून ती निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावी, असे आवाहन निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

# रेणुका नामवाडे यांना सादर केलेल्या प्रबंधकास लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाबची पदवी

नवीन नांदेड -लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाब मधुन रेणुका शेषेराव नामवाडे , (काकडे ) यांनी वेगवेगळ्या परतसाठा व्यवस्थापन प्रतिमानाचा अभ्यास या विषयावर प्रबंध सादर केला असून विद्यापीठाने सदरील विषयास मान्यता दिली असून या बद्दल परिवारातील सदस्य, मित्र मंडळ यांनी अभिनंदन केले आहे.



मार्गदर्शक प्राध्यापक डॉ.नितीन कुमार मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंध सादर करण्यात आला आहे. २५ ऑक्टोबर २५ प्रबंध सादर करण्यात आला होता. १२ संशोधन पेपर सादर केले होते, त्यापैकी ५ हे डउजझणड मानांकन यादीत नमुद झाले असून त्याचा निकाल २८ ऑक्टोबर रोजी मान्यता दिली असून, गेल्या चार वर्षांपासून ह्या प्रबंध सादर करण्यासाठी अभ्यास केला. रेणुका ह्या चडल चरींहशारीं-ळली, झहीळली,झत्रऌड, चक-डएढ, इ.शव, ढ-खढ, ऋ-ढए असे शिक्षण लग्नानंतर पूर्ण केले आहे यात त्यांचे पती संतोष काकडे आणि सासरे दादाराव काकडे, वडील शेषराव नामवाडे यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली, सध्या गुरु नानक विद्यान महाविद्यालय, बल्लारपूर येथे कार्यरत आहेत,तर सिडको औद्योगिक वसाहतीतील उद्योजक शेषेराव नामवाडे यांच्या त्या कन्या आहेत. शालेय शिक्षण हे शिवाजी विद्यालय सिडको, आणि इ.डल इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको आणि च.डल द्न्यानोपासक महाविद्यालय परभणी येथून पूर्ण झाले.

उप कुलगुरू जसपाल सिंग संधू यांनी या प्रबंधकास मान्यता दिली आहे. संबंधित युनिव्हर्सिटी ही देशातील पहिल्या पाच मध्ये समावेश असून नॅक चे अ++ मानांकन आहे.

आमचे स्नेही तथा उद्योजक शेषेराव नामवाडे यांची मुलगी रेणुका नामवाडे काकडे यांच्या प्रबंधकास लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाबाने मान्यता दिल्याबद्दल नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रमेश ठाकूर , अनिल पाटील धमणे, सारंग नेरलकर,जाधव यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या

# किनवट नगरपरिषद निवडणूक २०२५ : नामनिर्देशन प्रक्रियेला उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

किनवट /प्रतिनिधी

दि. १४ किनवट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रक्रियेला आज अधिकृत गती मिळाली. नामनिर्देशन दाखल करण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यात एकूण १७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या शर्यतीत प्रवेश केला. अखेर ११ तारखेपासून सुरू झालेल्या नामनिर्देशन प्रक्रियेत आज दि. १४ नोव्हेंबर रोजी उमेदवार आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. नगर परिषद कार्यालय परिसरात सकाळपासूनच निवडणुकीचा माहोल चांगलाच रंगलेला दिसत होता.

नगराध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज; स्पर्धेची उत्सुकता वाढली , नगराध्यक्ष पदासाठी नेम्मानीवार अनुजा किरणकुमार यांनी एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल केला आहे. महिलांना दिलेल्या आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर या जागेवर कोण उमेदवार उतरणार, याविषयी गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चा होती. अखेर आज अनुजा किरणकुमार यांनी अर्ज दाखल केल्यानंतर या पदाची स्पर्धा कोणत्या दिशेने जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

१६ नगरसेवक जागांसाठी उमेदवारांची चढाओढ

नगरपरिषदेकडे असलेल्या १६ नगरसेवक पदांसाठी विविध प्रभागांतून उमेदवारांनी अर्ज दाखल केले. काही प्रभागांत एकापेक्षा जास्त उमेदवारांनी नामनिर्देशन केल्याने पुढील चुरस वाढण्याची चिन्हे आहेत.

आज दाखल झालेले नगरसेवकांचे अर्ज :

प्रभाग ३ (ब) सिरमनवार संजय गंगन्ना तवर फेरोज बाबु प्रभाग २ (अ) मारपवार प्रेमला रमेश (२ अर्ज दाखल) प्रभाग ५ (अ) नेम्मानीवार चंद्रशेखर रंगराव प्रभाग १ (ब) येलचलवार कलावती वसंतप्रभाग ४ (अ) मंत्रीवार कैलास संटन्ना (२ अर्ज) प्रभाग ६ (अ) जयस्वाल शरद मोहनलाल खान अरसलान अकबर प्रभाग १० (अ) धोत्रे गणेश बालाजी मिरे मारोती गोविंद प्रभाग ७ (ब) पाटील सुनिल किशनराव प्रभाग ८ (ब) सातुरवार सुरज किशनराव प्रभाग १० (ब) गंधेवार निर्मला रमेश प्रभाग १० (क) दिक्षीत पुनम लखनसिंग प्रशासन सज्ज, संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार तहसीलदार व निवडणूक निर्णय अधिकारी डॉ शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा बंदोबस्तात नामनिर्देशन प्रक्रिया सुरळीत चालू आहे. कार्यालयात उमेदवार व समर्थकांची वर्दळ असली तरी कुठेही अनुशासनभंग झाला नाही. पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवत संपूर्ण परिसरात कायदा-सुव्यवस्था सुरळीत ठेवली. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्याने किनवट राजकारणात चैतन्य परतले आहे. उमेदवारांच्या अर्जांवरून काही प्रभागात चुरस वाढण्याची दाट शक्यता असून मतदारवर्ग कोणाला पसंती देतो हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# भोकर येथील ग्रामीण रुग्णालय येथे १२ महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया

भोकर /प्रतिनिधी

भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात दुर्बीण द्वारे (लॅप्रोस्कोपी पद्धतीने) १२ महिला रुग्णावर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या या शस्त्रक्रिया जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख ,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रामभाऊ बुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संदेश जाधव यांच्या नियोजनानुसार हा कॅम्प राबविला. लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया डॉ. संतोष अंगरवार डॉ. अनंत चव्हाण यांनी केल्या या शास्त्रक्रिया दरम्यान परिसेविका ,आरोग्य निरीक्षक , आधीपरीचारिका, आरोग्य सेवक, कर्मचारी व कक्षसेवक यांनी परिश्रम घेतले.



# मौजे बळेगाव येथील अवैध दारू विक्री बंद करावी, पोलीस अधीक्षक यांना निवेदन

नायगाव /प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील मौजे बळेगाव येथे विनापरवाना अनाधिकृत रीत्या दारू विक्री करणाऱ्या सदर गावातील चार पाच व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करून कायमची दारू विक्री बंद करण्यात यावी असे तक्रारी निवेदन सामाजिक कार्यकर्ते देविदास पांडुरंग गायकवाड यांनी पोलीस अधीक्षक नांदेड याच्यासह वरिष्ठाकडे दिले आहे.

स्वाभिमानाने जीवन जगावे असे ग्रामीण भागातील लोकांना वाटत असले तरी चंदनाच्या झाडाला जसे विषारी सापाने विळका घालावा तसे गावातील प्रमाणिक चांगल्या व्यक्तीच्या कुटुंबाला गाव गुंडाकडून अवैध दारू दुकानाचा विळखा मौजे बळेगाव येथे पडलेला आहे गावात चार ते पाच व्यक्तीकडून अवैधरित्या दारू विक्री सर्रासपणे होत असल्याची तक्रारी निवेदन निवेदनकर्त्याने दिली आहे या अवैध दारू विक्रीमुळे गावातील तळीराम यांचा महिलांना नाहक त्रास होत आहे घाणेरड्या शब्दात अश्लील भाषेत शिवीगाळ करणारे दारुड्यांचा बंदोबस्त तर झालाच पाहिजे परंतु विनापरवाना अवैधरित्या दारू विक्री कायमची बंद करण्यात यावी व हा व्यवसाय करणाऱ्या चार-पाच व्यक्ती विरुद्ध योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते देविदास पांडुरंग गायकवाड यांनी नांदेड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक नांदेड व पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कुंटूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# सगरोळी येथील युवा शेतकऱ्यांची कर्जाला कंटाळून आत्महत्या

नांदेड :- सततच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे सगरोळी येथील युवा अल्पभूधारक शेतकऱ्यांने विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना सगरोळी येथे घडली असून यामुळे गावावर शोककळा पसरली आहे.

मागील काही वर्षापासून नैसर्गिक प्रकोपामुळे शेतकऱ्यांवर ना पिकीचे संकट कोसळत असून यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून या नैसर्गिक संकटाच्या नापिकीमुळे डोक्यावर कर्जाचे ओझे झाल्यामुळे या नैराश्यातुन सगरोळी येथील अल्पभूधारक युवा शेतकरी माधव रामलु चुन्नमवार वय वर्षे ३९ हे कर्जबाजारी पणाला कंटाळून गेल्या दोन दिवसा पुर्वी विषारी औषध पिल्यामुळे त्यास शेजारी तेलंगना राज्यातील निजामाबाद येथे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार चालु आसताना आज ता. १४ डिसेंबर रोजी पहाटे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला असून या घटनेमुळे सगरोळी गावावर शोककळा पसरली असून या अल्पभूधारक शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# शनिवारवाड्यापासून धडकणार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

नांदेड / प्रतिनिधी

माध्यमिक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी सातत्याने पत्रव्यवहार करून देखील शिक्षण संचालकाने कायम दुर्लक्ष केले आहे. या विरुद्ध आता पुण्याच्या शनिवारवाड्यापासून शिक्षण संचालक कार्यालयावर बेधडक मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष सरिता पाळजकर- साकळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

न्यायालयीन आदेशानंतर सुरू करण्यात आलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून बंद केली आहे.

या प्रमुख मागणीसह अन्य बारा मागण्या संदर्भात आयुक्तांना जाब विचारण्यासाठी पुणे येथील शनिवारवाड्यापासून १७ नोव्हेंबर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन राज्य उपाध्यक्षा सरिता पाळजकर साकळकर , जिल्हाध्यक्ष गोपाळ पेंडकर, प्रकाश देशमुख, फारूक सर आदींनी केले आहे

# बेघरांना खरी जिव्हाळ्याची गरज-विजय जाधवर



प्रतिनिधी । बीड

चांगले व्यक्तिमत्व कधीच जन्म घेत नाही. ते निर्माण करावे लागते. आपल्या सोबत दुसऱ्याचं ही भलं व्हावं अशी ज्यांची मानसिकता असते. त्यांना आयुष्यात कधीच कमी पडत नाही. सध्या कुटुंबात दिवसेंदिवस जिव्हाळा कमी होत चालला असून बेघरांची संख्या वाढत आहे. त्यासाठी बेघरांना वयोवृद्ध वयात मायेची उब देणे खूप गरजेचे आहे.त्यासाठी आपण सर्वांनी मिळून मदतीचा हात पुढे करत सहकार्य करणे गरजेचे आहे .असे मत बीड जिल्हा पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी बेघर निवारा केंद्रात वाढदिवसानिमित्त सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले. बेघर जीव्हाला केंद्रामध्ये अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्याचे हे त्यांचे पाचवे वर्ष आहे. गणराज बँकेचे संचालक मधुकर जाधवर व सौ. डॉ. संगीता जाधवर यांची कन्या समृद्धी हीचा ही वाढदिवस नुकताच दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी बेघर जिव्हाळा केंद्रात साजरा करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गुळभिले, वसुदेव मिसाळ, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजकुमार मोरे, बाबासाहेब जायभाये , सय्यद जाकेर ,दत्ता दुधाळ, मादळमोहीकर,रासवे, बाळासाहेब नागरगोजे, आदिनाथ मुंडे, सुरेश तांबडे, प्रदीप जगताप,शंकर भांगे ,सुरेंद्र बारगजे ,कल्याण सानप, लक्ष्मण चाटे ,लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, सुदाम कोळेकर, मधुकर ढाकणे आदींची उपस्थिती होती.